‘ हरिभाऊं ’चे साप्ताहिक

# करमणूक

भास्कर गिरधारी

विभा प्रकाशन
नाशिक-५

‘हरिभाऊं’चे

साप्ताहिक-

# करमणूक

भास्कर गिरधारी

विभा प्रकाशन, नाशिक-५.

१९९१

हरिभाऊंचे साप्ताहिक 'करमणूक'
Haribhaunche Saptahik 'KARMNUK'


डॉ. भास्कर गिरधारी
DR. BHASKER GIRDHARI



प्रकाशिका :

सौ. वसुधा भास्कर गिरधारी
विभा प्रकाशन,
'विभा' पर्णश्री सोसायटी,
संभाजी नगरजवळ, नाशिक-४२२००५.



सर्वाधिकार : प्रकाशिकेच्या स्वाधीन.



मुद्रक :

श्री. परशुराम लक्ष्मण पाटील
सन्मार्ग प्रिंटिंग प्रेस,
नवेदर बेली, अलिबाग (रायगड)

प्रथम आवृत्ती :
१५ ऑगस्ट, १९९१

ग्रंथालयीन वर्गीकरण
द्विबिंदु वर्गांक :
दशांश वर्गांक :

मूल्य १०/-
(दहा रुपये)

# कृतज्ञता -

हरि नारायण आपटे याच्या 'करमणूक' साप्ताहिकाला १९९० साली १०० वर्षे पूर्ण झाली. 'करमणूक' शताब्दी निमित्ताने साप्ताहिक 'करमणूक'चा वाङ्‌मयीन अभ्यास करावा आणि तो वेळीच प्रसिद्ध करावा असा विचार मनात घोळत असतानाच 'मराठी नियतकालिकांचा वाङ्‌मयीन अभ्यास' या ग्रंथाच्या या ग्रंथाच्या दुसऱ्या खंडासाठी 'करमणूक' वर लिहावे अशी प्रेरणा डॉ. सरोजिनी वैद्य आणि डॉ. उषाताई देशमुख यांनी दिली. त्या कामाला लागलो. त्यातूनच एक परिचयात्मक लेख 'करमणूक'वर लिहून झाला. तो हैद्राबादच्या 'पंचधारेतून (जुलै, डिसें. १९८८) प्रसिध्द झाला. त्या आधारेच ज्येष्ठ सुहृद श्री. रविंद्र पिंगे यांनी मुंबई मराठी साहित्य संघ आयोजित करीत असलेल्या कै. प्रा. ल. ग. जोग व्याख्यान मालेत 'हरिभाऊंचे साप्ताहिक-करमणूक' याच विषयावर बोलण्यासाठी निमंत्रित केले. तीन दिवसाच्या या व्याख्यानमालेत मा. श्री. शंकर सारडा आणि डॉ. अनुराधा औरंगाबादकर यांचाही समावेश होता. तेव्हा मुंबईच्या जोग व्याख्यान मालेत प्रस्तुत विषयावर दि. १६ फेब्रु. १९८९ ला एक व्याख्यान पुष्प गुंफता आले, हे मी माझे सद्भाग्य मानतो.

यातूनच प्रस्तुत पुस्तिका सिध्द झाली आहे. त्यासाठी मुंबई विद्यापीठाच्या सांताक्रुझ येथील 'जवाहरलाल नेहरू ग्रंथालया'कडे, दादरच्या 'मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालया'कडे धाव घ्यावी लागली. या कामी ग्रंथालयाधिकारी श्री. अ. चिं. टिकेकर आणि श्री. अच्युत तारी आणि त्यांचे सर्व सहकारी यांचे विशेष उल्लेखनीय सहाय्य लाभले.

मराठीतील जाणते समीक्षक गुरुतुल्य प्रा. डॉ. भालचंद्र फडके यांनी मुद्दाम सवड काढून आपल्या प्रस्तावनेने पुस्तिकेचा शुभारंभ करून दिला. गुरुवर्य डॉ. ग. मो. पाटील यांनी संस्कृत श्लोकांचा अर्थ उलगडून दाखविला. अलिबागच्या सन्मार्ग प्रिंटिंग प्रेसचे श्री. परशुराम लक्ष्मण पाटील यांनी सुबक व आकर्षक मुद्रण करून दिले. ही पुस्तिका प्रकाशात आणण्याचे संपूर्ण श्रेय माझे सन्मित्र प्रा. डॉ. माधवराव पोतदार (पेण) यांनाच आहे. त्यांनी कोणतीही अडचण येवू न देता विशुद्ध मुद्रणाची जोखीम पार पाडली. अन्यथा जव्हारसारख्या आदिवासी क्षेत्रात अशा लेखनाला प्रकाश लाभणे केवळ अशक्य होते. प्राचार्य देवदत्त तुंगार यांचे सातत्याने जे सहकार्य लाभले ते मोलाचे असून त्यांचा व इतर सर्व सहकाऱ्यांचा मी अतिशय ऋणी आहे.

डॉ. भालचंद्र फडके यांनी प्रस्तावनेत नमूद केल्याप्रमाणे आर्यभूषण छापखान्यातील अंकाची उपलब्धी. तसेच डॉ. श्रीपती कापरे यांचा ' करमणूक ' वरील अप्रकाशित प्रबंध वा ' मराठी कथेची वाटचाल ' पाहायला हवे होते. परंतु जयकर ग्रंथालयाकडून पत्रव्यवहार करुनही ' करमणूक 'बाबत संदर्भ साहाय्य उपलब्धी-बाबत कळविले गेले नाही. एका अर्थाने डॉ. भालचंद्र फडके यांची ही प्रस्तावना घेतल्याने ' न्यून्य तें पुरते ' झाले आहे.

मोखले एज्युकेशन सोसायटीने याही पुस्तिकेच्या प्रकाशनासाठी रुपये ५०० चे अनुदान दिले, त्याबद्दल संस्थेचे सचिव मा. डॉ. मो. स. गोसावी यांचा मी कृतज्ञ आहे.

या निमित्ताने हरिभाऊ आपट्यांच्या मूळ साप्ताहिक 'करमणूक ' च्या अंकाकडे जाणकार मराठी रसिक-वाचकांचे लक्ष वेधले गेले आणि वाङ्मयीन नियतकालिकांच्या आणि मराठीच्या अभ्यासकांना ही पुस्तिका उपयुक्त ठरली तरच या लेखनाचे सार्थक होईल.

विभा प्रकाशनाच्या या पाचव्या प्रकाशनाला मराठी रसिकांनी उत्तम प्रतिसाद द्यावा, अशी नम्र विनंती आहे.

वंदनीय पिता श्री. बाबासाहेब गिरधारी, वाहेगावकर यांच्या चरणी ही पुस्तिका अर्पण करतो. कारण त्यांनीच कंबर कसून निर्भयपणे सदा वागण्याचा संदेश दिला आहे.

पुनश्च कृतज्ञता !

गुरुपौर्णिमा, शके १९१३
दि. २६ जुलै, १९९१.

**—भास्कर गिरधारी**

# प्रस्तावना –

एकोणिसावे शतक म्हणजे आज विकासात झालेल्या कथा, कादंबरी, काव्य, नाटकादि वाङ्मय प्रकारांची गंगोत्री ! आजची नवकथा, स्फुट गोष्ट, संपूर्ण गोष्ट लघुकथा असा प्रवास करीत विकसित झाली आहे. तशीच आजची कादंबरी हे हरि नारायणांच्या कादंबरीचे विकसित रूप होय. हरिभाऊंची स्फुट गोष्ट अवतरली ती करमणुकीच्या पानांत मिळालेल्या थोड्या जागेत तर हरिभाऊंच्या प्रकरणशः येणाऱ्या कादंबरीने करमणुकीची अर्ध्याहून अधिक पानें व्यापली आहेत. एका अर्थाने मराठी वाङ्मयातील जवळ जवळ सर्व वाङ्मय प्रकार करमणूकीने जोपासले आहेत. १८९० ते १९२० असा जवळ जवळ तीस वर्षांचा कालखंड ' करमणूक कालखंड ' म्हणून संबोधता येईल.

अशा एका महनीय नियतकालिकाचा वाङ्मयीन अभ्यास आमचे मित्र प्रा. डॉ. भास्कर गिरधारी यांनी आस्थापूर्वक केला आहे. हा अभ्यास प्राधान्याने परिचयात्मक आहे. वाङ्मयीन नियतकालिकांचा अभ्यास करावा आणि साहित्य प्रकाराच्या विकासाला आणि विस्ताराला या नियतकालिकांनी कोणते योगदान दिले त्याचा चिकित्सक अभ्यास करण्याची कल्पना मराठवाडा विद्यापीठात असताना गुरूवर्य प्रा. वा. ल. कुळकर्णी यांनी मांडली. आणि ' ज्ञान प्रसारक ' या पहिल्या वाङ्मयीन नियतकालिकाची कामगिरी त्यांनी विशद केली. त्यानंतर विविध ज्ञान विस्ताराने साहित्य विचारात कोणती भर टाकली त्याचा शोध घेतला. वाङ्मयीन नियतकालिकाचा चिकित्सक अभ्यास मराठी वाङ्मयाचा इतिहास सिद्ध करण्यासाठी साधनभूत ठरतो. म्हणून तर वाङ्मयीन नियतकालिकांचे चिकित्सक अभ्यास संशोधकांने परिश्रमपूर्वक केले पाहिजेत.

करमणूकचा मासला वा नमुना अंक २५ ऑक्टोबर १८९० रोजी निघाला. आणि २२ डिसेंबर १९१७ पर्यंत म्हणजे एकूण २७ वर्षे अव्याहतपणे चालू होते. गुरूवर्य प्रा. वा. ल. कुलकर्णी यांचे पत्र घेऊन मी आर्यभूषण छापखान्यात गेलो आणि ' करमणूक ' साप्ताहिकाचे सर्व बांधीव अंक अभ्यासता आले. मराठी कथेची वाटचाल या प्रबंधासाठी करमणुकीतील कथालेखन हे प्रकरण लिहिले. या प्रकरणाच्या आधारे लिहिलेला माझा निबंध सत्यकथेत प्रसिद्ध झाला होता. पुढे डॉ. श्रीमती सुधा कापरे यांनी माझ्या मार्गदर्शनाखाली करमणुकीचा सर्वांगीण अभ्यास केला आणि त्यांचा प्रबंध पी.एच्. डी. पदवीसाठी मान्य झाला. त्यांच्या प्रबंधात करमणुकीच्या २७ वर्षांच्या अंकांची एक सविस्तर सूचीही आहे. म्हणून प्रा. गिरधारी जेव्हा लिहितात की, करमणुकीचे अंक सुस्थितीत मिळणे दुरापास्त आहे. (पा. ७) तेव्हा त्यांनी आर्यभूषण छापखान्यातील अंक पाहिले नसण्याची शक्यता आहे. अभ्यासाची साधने यात मराठी कथेची वाटचाल आणि डॉ. श्रीमती कापरे यांचा उल्लेख आढळत नाही. हे दोन्ही अप्रकाशित प्रबंध जयकर ग्रंथालयात उपलब्ध होऊ शकले असते. असो.

१ नोव्हेंबर १८९० च्या अंकात करमणूक पत्र आपण का काढले त्याचे विवेचन हरिभाऊंनी विस्ताराने दिले आहे. " केसरी सुधारकादी पत्रे आपल्या कुशल

लेखणीने जे काम निबंधाच्याद्वारे करितात तेच काम हे पत्र मनाची करमणूक करून करणार " असे हरिभाऊ आपल्या उद्दिष्टांचे मुख्य सूत्र सांगतात. सामाजिक प्रबोधन आणि लोकरंजन हे मुख्य हेतू बाळगून 'करमणूक' पत्र हरिभाऊंनी चालवले. वाङ्मयीन नियतकालिकाला आपले तात्त्विक धोरण असायला हवे आणि अशी तात्त्विक बैठक असल्याशिवाय वाङ्मयीन नियतकालिकाला उत्तम दर्जा प्राप्त होत नाही. आज मराठीत जी वाङ्मयीन नियतकालिके आहेत त्यांना तात्त्विक बैठक नाही म्हणून या सर्व नियतकालिकांना दूरदर्शनवरील 'चित्रहारां'ची कला लाभली आहे. साहित्य संशोधन, साहित्यातील नव्या प्रवाहामागील कारणमीमांसा, साहित्य-विचार, साहित्यविषयक प्रश्न, वाङ्मयीन अभिरूचीचा अभ्यास इत्यादींचा समावेश वाङ्मयीन नियतकालिकात असायला हवा पण आजच्या मराठीतील वाङ्मयीन नियतकालिकाना निश्चित दिशा नाही आणि त्यांना वाङ्मयीन अभिरूचीचे पोषणही करता येत नाही हरिभाऊ म्हणतात, " जी गोष्ट जनसमूहाने अवश्य करावी म्हणून केसरी, सुधारक एखाद्या कठोर पित्याप्रमाणे कठोर शब्दाने सांगणार व समाजाचे अप्रशस्त वर्तन झाल्यास वेळीच वाग् प्रतोदाचे तडाखे लगावणार. तीच गोष्ट हे पत्र प्रेमळ मातेप्रमाणे गोड गोड शब्दांनी व चांगल्या चांगल्या गोष्टींनी अप्रशस्त वर्तनाबद्दल मायेचे शासन करणार, एवढे मात्र ध्यानात ठेवावे. की हे पत्र आचरट आईप्रमाणे फाजील लाड करणार नाही." हरिभाऊंनी वाचकांना बजावले होते की, त्यांना आचरट, पाचकळ आणि फाजील मजकूर वाचायला मिळणार नाही. कारण हरिभाऊंनी वाङमयविषयक भूमिका स्पष्ट करताना म्हटले होते—

> " (त्यास) वाचकास मनुष्यत्वांकडून काढून देवत्वाकडे जाण्याबद्दल उत्सुक करून त्या मार्गाला सन्मुख करणारे—असे जे कोणाचेही अंत:स्फूर्तीने शब्दरूप घेऊन मुखावाटे बाहेर पडलेले किंवा लेखणीने लिहून ठेवलेले विचारोद्‌गार त्या सर्वांना समुच्चयाने वाङ्मय ही संज्ञा आहे."

समाजाचे दोषदिग्दर्शन करणारे लेखन करणे हे जसे लेखकाचे काम आहे तसेच त्यावर उपाय व योजना सुचवणे हेही त्याचे काम आहे. ही असली भूमिका हरिभाऊंनी कथा-कादंबऱ्या लिहिताना स्वीकारलेली आहे. करमणूक हे लोकांचे रंजन करून प्रबोधन करण्यासाठी काढलेले एक कौटुंबिक सद्‌भिरुचिसंपन्न नियतकालिक होते, हा डॉ. गिरधारी यांचा अभिप्राय कुणालाही मान्य होईल.

हरिभाऊंनी करमणुकीतून जे कादंबरी लेखन केले त्याचा परिचय प्रस्तुत वाङ्मयीन अभ्यासात आहे. हरिभाऊंच्या सामाजिक कादंबरीतून जे जीवनदर्शन घडते ते पांढरपेशा मध्यमवर्गाचे ! म्हणून तर त्यांच्या कादंबरीला 'सदाशिव पेठी' असे संबोधले जाते. " पण लक्ष्यात कोण घेतो." या कादंबरीत जे सदाशिवपेठेतील पांढरपेशांचे मध्यमवर्गीय कुटुंब आपल्यासमोर उभे राहते त्या कुटुंबात यमूचे जे दु:ख आहे, ते स्त्री जातीचे दु:ख आहे. कलाकृतीतील अनुभव विशिष्टतेचे कवच फोडून अधिक व्यापक होत असतो. सर्वस्पर्शी होतो. वज्राघात ही ऐतिहासिक कादंबरी ही केवळ ऐतिहसिक नाही तर तिला एका चांगल्या शोकात्मिकेचा दर्जा

लाभतो. मेहेरजानवरील प्रीती आणि राज्यतृष्णा याच्यापैकी रामराजाने 'राज्य' निवडले आणि मेहेरजानची प्रीती दूर सारली. त्यामुळे त्याच्या वाट्याला काय आले ते केवळ दुःख ! रामराजा मनाशी म्हणतो– आपण जे काय दूर सारले तेच खरे सुख, महत्वाकांक्षेने ज्याच्या मागे लागलो ते सुख नव्हे, तसे पाहिले तर सर्व माणसाला सुख हवे असते, पण कधी कधी ज्याच्यावर निस्सीम प्रेम केले तेच दुःख भोगाला कारण होते, तर कधी कधी दोन मूल्यांच्या संघर्षात एकाची निवड केली ती निवडच दुःख भोगाला कारण ठरते, तर कधी नियतीच्या लहरीमुळे दुःख भोगावे लागते. माणूस मुळातच दुःखचक्रांत गवसलेला आहे आणि अशा माणसाचा शोध घेण्यात हरिभाऊ विलक्षण रंगतात असे त्यांच्या सामाजिक वा ऐतिहासिक कादंबऱ्या वाचताना जाणवते हरिभाऊंच्या कादंबरी लेखनात विस्कळितपणा, पाल्हाळिकता, बंदिस्त रचनेचा अभाव इत्यादी दोष असले तर त्यांचे जीवनविषयक आकलन अत्यंत सूक्ष्म, सखोल आहे.

हरिभाऊंची कादंबरी जशी वेधक आहे तशी त्यांची स्फुट गोष्टही चित्ताचा ठाव घेते. हरिभाऊंच्या 'स्फूट गोष्टी' तही पांढरपेशा मध्यमवर्गाच्या सुखदुःखाचे, प्रश्नांचे, त्यांच्या आशा-आकांक्षांचे चित्रण आहे. या वर्गाच्या माजघरात, स्वयंपाक घरात, दिवाणखान्यात जे घडते त्याचे चित्र आढळते. पतिपत्नी, पितापुत्र, सासू- सून बहीणभाऊ, शेजारीपाजारी यांच्या दरम्यान जे नाते आहे, जे संबंध आहेत त्यावर प्रकाश टाकणारी त्यांची स्फुट गोष्ट आहे. 'थोडया चुकीचा घोर परिणाम' या दीर्घ कथेत ते दारुच्या व्यसनाचे दुष्परिणाम रंगवतात. तर 'काळ तर मोठा कठीण आला' या दीर्घकथेत दुष्काळाचे चित्रण आहे. ही कथा Story of Ramji या नावाने ओळखली जाते. आणि ती पहिली रुपांतरित कथा आहे. पाडव्याला भेट, दुर्गाताईची ओवाळणी, पुरी हौस फिटली (नेकलेस या मोपाँसाच्या कथेचं रुपांतर) इ. वाचल्यातरी हरिभाऊंच्या निवेदन शक्तीचा प्रत्यय येतो. हरिभाऊंच्य स्फुट गोष्टीला स्वतःचे असे रुप होते बोधपर आणि करमणूक करणाऱ्या स्फुटगोष्टी प्रामुख्याने कुटुंबाचे चित्र रेखाटणाऱ्या आहेत. हरिभाऊंच्या 'स्फुटगोष्टी' पासून प्रेरणा घेऊन अनेक नव्या कथालेखकांनी करमणूकीतून स्फुटगोष्टी लिहिल्या आणि हळूहळू स्फुटगोष्टीचा नवा वाचकवर्ग निर्माण झाला करमणुकीतील 'स्फुटगोष्ट' मनोरंजनात संपूर्ण गोष्ट झाली आणि वि. सी. गुर्जरांचे गोष्टीयुग सुरु झाले.

करमणूकीत कवितेला तसे गौण स्थान होते. कविवर्य केशवसुत, बी. गोविंदाग्रज इत्यादींच्या कविता करमणुकीतून आल्या. कवितेप्रमाणे छोटे लेख, शास्त्रीयलेख, छोटी चरित्रे, नाटिका, चुटके असे कितीतरी विविध प्रकारचे लेखन प्रसिद्ध झाले 'करमणूक' या अग्रेसर नियकालिकाच्या वाङ्मयाचा अभ्यास ही छोटी पुस्तिका लिहून डॉ भास्कर गिरधारी यांनी पहिले पाऊल टाकले आहे, याच प्रकारे करमणूक कालखंडातील अन्य नियतकालिकांचा वाङ्मयीन अभ्यास करण्याचे कार्य डॉ. गिरधारी यांनी हाती घ्यावे.

यशवंतराव चव्हाण
महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
८ ऑगस्ट १९९१

— भालचंद्र फडके

# अंतरंग—


१) प्रास्ताविक

२) करमणूक प्रारंभ

३) करमणूकीचे स्वरुप

४) करमणूकीचे संपादक– हरिभाऊ

५) करमणूकीचे उद्दिष्ट

६) प्रारंभीचे सुभाषित

७) करमणूकीचे अंतरंग

८) करमणूकीतील कादंबरी

९) करमणूकमधील कविता

१०) करमणूकमधील कथा

११) करमणूक : संकीर्ण लेखन

(i) चरित्रात्मक लेखन

(ii) नाट्यलेखन

(iii) ललित लेखन

(iv) शास्त्रीय लेखन

(v) काही मौजेच्या व चरित्रात्मक गोष्टी

(vi) काही विनोदी किस्से,

१२) समारोप.

# करमणूक : वाङ्मयीन अभ्यास

-डॉ. भा. त्र्यं. गिरधारी

## प्रास्ताविक-

मराठी नियतकालिकाकडे एक दृष्टिक्षेप टाकला तरी 'करमणूक' नियतकालिकाचे वेगळेपण ठळकपणे आपल्या नजरेत भरते, ही वस्तुस्थिती आहे. अगदी नावापासून विचार केला तरी निर्भेळ शुद्ध करमणूक करण्याचे उद्दिष्ट बाळगून मराठीतील सुप्रसिद्ध कादंबरीकार, कथाकार, समाजसुधारक हरि नारायण आपटे यांनी परिश्रमपूर्वक या साप्ताहिकाचा सारा भार समर्थपणे पेलला, असे म्हणता येईल.

'केसरी', 'सुधारक', 'निबंधमाला', 'ज्ञान प्रसारक', 'शाळापत्रक', 'विविध ज्ञान विस्तार', मनोरंजन', 'निबंध चंद्रिका', 'सचित्र करमणूक' इत्यादी नियतकालिकांच्या फेऱ्यात निव्वळ मनोरंजन आणि करमणुकीला बांधलेले एक नियतकालिक म्हणून 'करमणूक' आपल्या आगळेपणाने लक्ष वेधून घेते करमणुकीबरोबरच 'ज्ञान' महत्त्वाचे मानले असल्यामुळे, एकाचवेळी मनोरंजन आणि उपयुक्त ज्ञान वाचकांना पेलवेल अशा तऱ्हेने मांडणारे हे नियतकालिक होते, तोच तो पणाचा आणि रूक्ष नीरस तत्त्वज्ञानाचाही शेवटी सामान्य वाचकाला कंटाळा येतोच. राजकारणाचाही प्रसंगविशेषी वीट येतो. या पार्श्वभूमीवर ही शनिवारची करमणूक मौजेची व एक विरंगुळा म्हणून साहित्य रसिकांना आवडली. तत्कालीन वाचकांची गरज कमालीच्या अचूकपणे हेरण्यात संपादकाचे विशेष कौशल्य व वाङ्मयीन जाण आपल्या दृष्टोपत्तीस येते. महत्त्वाचे म्हणजे सतत वाचकांच्या नाडीवर आपला एक हात ठेवून त्याची अभिरुची, आवड, निवड लक्षात घेऊन हरिभाऊंनी पुढील संपादन कार्यही अव्याहतपणे चालू ठेवले. नियतकालिकांच्या मालिकेत त्यामुळेच करमणूक साप्ताहिकाला एक वेगळे नियतकालिक म्हणून अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झालेले आहे. हरिभाऊंच्या कादंबऱ्या मालेच्या रूपाने सादर करणारे, भरपूर रंजनाचा व उपयुक्त ज्ञानाचा मालमसाला ठासून भरलेले, भाषाशैलीच्या दृष्टीने मध्यमवर्गीय, पांढरपेशा समाजाचे एक नियतकालिक म्हणून 'करमणूक' साप्ताहिकाने जनमानसात आपले स्थान सिद्ध केले आणि त्याचा खपही सतत वाढता राहिला.

## वर्गणीबाबतची नोंद–

पत्राची आगाऊ सालीना वर्गणी १ रु.
मुंबईच्या वर्गणीदारास आगाऊ १। रु.
एम्. ओ. ने इतरांस १ रु. १४ आणे.
व्हॅल्यू पेयेबल मागविल्यास २ रु.

अशी आहे. पुढे त्यात किरकोळ बदल झालेला आहे. गावावरूनही हा वर्गणीचा दर बदलतो. मुखपृष्ठ'वर सुंदर स्त्रीचे चित्रे आहे. आर. एम्. टिळक यांनी ते काढलेले आहे. मुखपृष्ठ कमालीचे साधे असून कमी जागेत 'टायटल लेटरिंगज्' टाकलेले आहे. या अंकात सचित्रता आरंभी नसली तरी नंतर मात्र राजा-राणी यांची अकर्षक रंगीत चित्रे आहेत. (करमणूक दि. २३।१२।१९११) कथेलाही चित्र देण्याचा प्रयत्न केला आहे. पण मुद्रण आणि छपाईच्या मागासलेपणाची साक्ष त्यात दिसते. चित्राचा मागील भाग संपूर्ण कोरा ठेवून पाने छापलेली आहेत. 'वकिलसाहेबांची होळी' या कथेला चित्र दिले. (करमणूक १०।३।१९०६) हे नमूद करण्याचे कारण त्यावेळच्या मुद्रणाच्या मर्यादांचेही स्मरण असावे एवढेच आहे. जाहिराती, नोटिसा वगैरे संबंधाने ज्यास पत्रे पाठवायची असतील, ती त्यांनी मॅनेजर आर्यभूषण प्रेस पुणे या पत्त्यावर पाठवावी. पत्रात छापण्यासाठी मजकूर पाठविणे. ती रा. रा. करमणूक कर्ते आनंदाश्रम पुणे या पत्त्यावर पाठवावा. इतर व्यवस्थेसंबंधाने सर्व पत्रव्यवहार कुळकर्णी आणि मंडळी, बुधवार पेठ पुणे यांच्याकडे करावा, असे तीन भिन्न पत्ते संपर्कासाठी अंकावर दिलेले आहेत.

## 'करमणूक'चे संपादक 'हरिभाऊ'–

सुदैवाने हरि नारायण आपटे यांच्यासारखे शिक्षक आणि चतुरस्त्र लेखक, कथा, कादंबरीकार आणि नाटककार 'करमणूक'चे जन्मदाते संपादक आहेत. त्यामुळे या नियतकालिकाचे स्वरूप विशुद्ध वाङ्मयीन आणि निखळ करमणूकीचे असून एक अभिरुचि-संपन्न दर्जा त्याला लाभला आहे. समृद्ध आणि संपन्न व्यक्तिमत्त्वाचे संपादक लाभणे आणि त्यांच्या कसदार लेखणीचा, भाषाशैलीचा आविष्कार सातत्याने होणे हा एक दुर्मिळ योग येथे साधला गेला आहे. हरि नारायण आपटे म्हणजे एक असामान्य समृद्ध वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व होते. त्यांनी एकूण २० कादंबऱ्या नाटके, ४ स्फुट गोष्टींचे भाग, काही टीका लेख प्रहसने आणि अद्यापही अप्रकाशित राहिलेले सुमारे ८०० पानी साहित्य स्वत:च निर्माण केल होते. जर्मन, फ्रेंच, बंगाली, संस्कृत या भाषा त्यांना मराठी, इंग्रजी, हिंदीबरोबरच अवगत होत्या. त्यांनी संस्था संचालन, वृत्तपत्र संपादन, समाजकार्य केले. 'भारत वर्ष'

'मनोरंजन आणि निबंध चंद्रिका', 'करमणूक', 'सुधारक ज्ञानप्रकाश' इत्यादि नियतकालिकांचे संपादन कार्य केले. कथा, कविता, कादंबरी, चरित्र, नाटक, निबंध, बालवाङ्मय, भाषा, वाङ्मय विचार इत्यादी प्रकारांवर वैविध्यपूर्ण बहुगुणी लेखन केले. मराठी ललित व मनोरंजनाच्या साहित्य निर्मितीत हरिभाऊंच्या संपादकत्वामुळेच करमणूक नियतकालिकाला फार मोठे श्रेय द्यावे लागते. वाङ्मयीन दृष्टी असलेले संपादक स्वतःच्या कादंबरी आणि कथामालेने अंक संग्राह्य व आकर्षित करू शकतात याचा निर्वाळा 'करमणूक' देते.

८ मार्च, १८६४ ला 'पारोळे' या खानदेशातील गावी जन्मलेल्या हरिभाऊंच्या कार्याचा उचित गौरव डॉ. ल. म. भिंगारे यांनी त्यांच्या हरिभाऊ या ग्रंथात केला आहे. तो मुळाबरहुकूम पाहणे उचित ठरेल. ते म्हणतात, 'ज्या काळात पदवीधर नसणे आणि असणे यामध्ये सर्व सार्वजनिक व वैयक्तिक हालचालींच्या दृष्टीने फार मोठा भेद होता. ज्याकाळी धार्मिक व विवेचक, राजकीय व सामाजिक विचारसरणीमधील झगडे इतके तीव्र होते की, वर्तमान पत्रे ही केवळ स्वमत समर्थनाची व परमत खंडनाची तीव्र धारदार हत्यारे, प्रचारपत्रेच होती. त्याकाळी हरिभाऊंसारख्या पदवी नसलेल्या मनुष्याने राजकीय, सामाजिक वादग्रस्तेचा उघड वासही न लागलेले 'करमणूक' सारखे साप्ताहिक सतत २८ वर्षे अनेक संकटांशी टक्कर देऊन मुख्यतः स्वतःच्या एकट्याच्याच लेखन सामर्थ्यावर विसबून आणि कथा, कादंबरी, कविता–चरित्र इत्यादी केवळ ललित साहित्यास्तव चालवून दाखवावे हे अतिशय मोठे काम होय.

तथापि हाही भाग धंद्यातील अधिक उण्या कर्तबगारीचा व सतत कामसूपणाचा म्हणून दुर्लक्षिता येईल. परंतु कथा रचनेचे एकदा व्रत घेतल्यानंतर सुमारे ३५ वर्षांच्या काळात जीवनात जी अनेक अवस्थांतरे यावयाची ती येत असताना स्वतःची लेखणी जुनाटही ठरू द्यावयाची नाही आणि प्रवाहपतीतही होऊ द्यावयाची नाही. साऱ्याच साहित्यकृती सारख्याच उत्कृष्ठ वठणे अशक्यप्राय असले तरी कोणतीही वृत्ती ठराविक दर्जाच्या खाली येऊ द्यावयाची नाही. आणि एकदा आपले मिळविलेले स्थान सतत उच्च राखावयाचे, ही हरिभाऊंची साहित्य क्षेत्रातील मोठी कर्तबगारी आहे, शब्द सृष्टीतील ही चातुरी कोणत्याही क्षेत्रातील कर्तबगारीपेक्षा उणी मानण्याचे तर कारणच नाही. पण उलटपक्षी साहित्य हे युगानुयुगे चिकित्सा विषय राहणारे असल्यामुळे त्या चिकित्सेत टिकणारी ही चातुरी अधिक कौतुकास्पद ठरते.

हरिभाऊ हे स्वतः नेमस्त. राजकारणी व प्रख्यात कादंबरीकार होते. 'ज्ञानप्रकाश' व 'सुधारका'शी त्यांचा साक्षात संबंध आला. राजकारणी मत-प्रचारकापेक्षा त्यांचा पिंड ललित लेखकाचा होता. हरिभाऊंनीच जीवन आणि वाङ्मय यातील अतूट संबंध प्रथम संपूर्णत्वाने जाणला. म्हणूनच ते मराठी कादंबरीला तिचे स्वत्व देऊ शकले आणि पुढील नव्या लेखकांना नवी दिशा देऊ शकले. या हरिभाऊंच्या व्यक्तिमत्वाचे आणि त्यांच्या साहित्याचे साकल्याने घडणारे दर्शन म्हणजेच 'करमणूक' पत्र होय.

१८८३ मध्ये विष्णूशास्त्री चिपळूणकरांच्या चाहत्यांनी निबंध चंद्रिका हे नियत-कालिक मासिक काढले, त्यातही हरिभाऊंचे सहकार्य होते. तर ऐन वीशीत असताना सन १८८६ साली सुरू झालेल्या कानेटकर आणि मडळीच्या 'मनोरंजन' मासिकाच्या संपादकाची धुरा हरिभाऊंनीच साम्भाळली होती.' नाट्यकथा पर्वाचे' शंकर मोरो रानडे हे हरिभाऊंचे मार्गदर्शक होते. 'मनोरंजन' नावाप्रमाणेच त्यातही त्यांनी मनोरंजनावरच भर दिला. मनोरंजनाचा उद्देश, त्यात येणारे विषय शिक्षणाचा मुख्य उद्देश धरून जितके मनोरंजक व प्रतिष्ठित करता येतील, तितके करण्याचा आमचा विचार आहे. असाच होता, व मनोरंजन व 'निबंधचंद्रिका' या संयुक्त मासिकाचे ते १८८७-९२ या ५ वर्षे कालावधीत ते संपादक होते. एवढेच नव्हे तर १८८८ ते १८९४ या सहा वर्षात ज्ञानप्रकाशच्या इंग्रजी विभागाचे संपादन त्यांनी केले. सहृदयता सहानुभूती आणि करूणा यांची मानवाला पडणारी साद घ्यावी आणि द्यावी असा हरिभाऊंच्या कलावंताचा पिंड होता. नामदार गोपाळ कृष्ण गोखल्यांचे स्नेही म्हणून हरिभाऊंना ज्ञानप्रसार ही गोष्ट पवित्र आणि आवश्यक वाटत होती. हरिभाऊंची भूमिका उपयुक्ततावादी सुधारकाची किंवा निर्भेळ उद्धारक राष्ट्रवाद्याची नव्हती, तर ती सहृदय मानवतावाद्याची होती, त्या दृष्टीने त्यांना आगरकर आणि टिळकांपेक्षा नामदार गोखले अधिक जवळचे वाटत होते. हरि नारायण यांची 'करमणूक' चे संपादक म्हणून साहित्यिकावर संस्कार करण्याची व त्यांना घडविण्याची दृष्टी विशद करणारी एक घटना 'विश्रब्ध-शारदेत' नमूद केलेली लक्षात घेतल्यास त्यांची पुरती कल्पना येऊ शकेल.

नागपूरचे प्रसिद्ध कवी आनंदराव कृष्णाजी टेकाडे यांना त्यांच्या काव्यलेखनाच्या प्रारंभीच्या काळात ह. ना. आपटे यांनी 'करमणूक'चे संपादक या नात्याने लिहिलेले पत्र, होतकरू कवींना सांभाळून घेऊन व मार्गदर्शन करून त्यांना प्रोत्साहन देण्याची प्रवृत्ती उलगडून दाखविणारे आहे. ते पत्रच मुळातून अभ्यासण्याजोगे आहे.

पुणे : २-९-१९१३

सा. न वि. वि.

आपली ‘ चंद्रसेना ’ ही कविता व सोबतचे पत्र पावले, मला आपली कविता फार आवडली भाषा सुबोध व भाव सहजगम्य आहे. ही ता. ६ सप्टेंबरच्या ‘ करमणूकीत ’ प्रसिद्ध होईल. व अंकाची एक प्रत आपणाकडे पाठविण्यात येईल. ध्रुवपदाच्या नंतरच्या पहिल्याच कडव्यात—

‘ जे तुला जिवाहूनि थोर । रमेहुनि प्यार ।’

असे चरण आहेत ह्यातील ‘ प्यार ’ शब्द मात्र मला बरा वाटला नाही. एकंदर भाषेशी विसंवादी वाटतो, कळावे लोभ असावा, ही विनंती.

आपला,

**– ह. ना. आपटे**

(विश्रब्ध शारदा पृष्ठ ३४४)

हरिभाऊंचे निकटवर्ती प्रा. वि. वा. अंबेकर यांनी हरिभाऊंच्या चरित्रपर लेखात म्हटल्याप्रमाणे ‘ १८९४ नंतर हरिभाऊंच्या चरित्रातील संघर्ष संपून निर्मळ विधायक कार्याला स्वत:ला वाहून घेऊन आपल्या जीवनाचे एक निश्चित उद्दिष्ट शोधण्याची धडपड आहे. उत्तर आयुष्यात गवसलेले किंवा परिस्थिती आणि मनोवृत्ती यांनी नियमित केलेले उद्दिष्ट, विकसित करण्याची एक पद्धतशीर व सुरळीत उपक्रमशीलता आहे.’

(हरिभाऊ विविध दर्शन : पृष्ठ १८)

याचा प्रत्यय ‘ करमणूक ’च्या संपादनात आणि उद्दिष्टात येतो.

१८९९ मध्ये श्री. गोविंदराव डुकले यांनी करमणूक चालविण्यास घेतले होते. तर विठ्ठल जिवाजी नाडकर्णी यांचा लेखक व संपादकीय सहाय्यक म्हणून १८८१ ते अखेरपर्यंत ‘ करमणूक ’शी संबंध आला होता.

## ‘ करमणूक ’चे उद्दिष्ट—

साप्ताहिक ‘ करमणूक’चे उद्दिष्ट त्याच्या नावातूनच पुरतेपणी स्पष्ट झालेले आहे. किंबहुना एकोणिसाव्या शतकातील नियतकालिकांचेच एक वैशिष्टच आहे की त्यांची नावे अतिशय बोलकी व अर्थपूर्ण आहेत. त्यांच्या नावातच सारे सामावलेले आहे.‘ ज्ञान ’ आहे,‘ प्रकाश’ आहे. ‘ प्रबोध ’ आहे, आणि ‘ मनोरंजनही आहे. तसेच ‘ करमणूक ’ निव्वळ करमणुकीसाठी निघाले. ‘ मासल्याच्या अंकात करमणूक का निघणार ? ’ या सदराखाली उद्देशदर्शक मजकूर दिला होता. तो लोकाग्रहास्तव

हरिभाऊंनी पुन्हा दिनांक १ नोव्हेंबर, १८९० च्या वर्ष १ ले अंक २ मध्ये छापला आहे. त्यात ते म्हणतात...

" करमणूक पत्र काढण्याचा उद्देश-एवढाच की मराठी भाषा जाणणाऱ्या साधारण जनसमूहाचे मनोरंजन करून त्यांस व्यावहारिक, शास्त्रीय, इत्यादि अनेक गोष्टींचे " ज्ञान करून द्यावयाचे. केसरी, सुधारकादि पत्रे आपल्या कुशल लेखणीने जे काम निबंधाच्याद्वारे करितात तेच काम हे पत्र मनाची करमणूक करून करणार. इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, युनायटेड स्टेट्स इत्यादि देशांतील अर्वाचीन ग्रांथिक इतिहासाकडे पाहिले असतां दोन प्रवृत्ती, विशेष लक्षात येतात. एक प्रचंड ग्रंथाचे सार काढून देणे, व दुसरी अनेकविध शास्त्र मीमांसाची तत्त्वे, मनाचे रंजन होऊन कळतील अशातऱ्हेने सांगणे. देशांत सुधारणा व्हावी याकरिता केसरी सुधारणादिपत्रे पहिल्या प्रवृत्तीचें अवलंबन करून चालली आहेत. हे पत्र दुसऱ्या प्रवृत्तीच्या अवलंबनाने चालणार. जी गोष्ट जनसमूहाने अवश्य करावी म्हणून केसरी, सुधारक एखाद्या कठोर पित्याप्रमाणे कठोर शब्दाने सांगणार व समाजाचे अप्रशस्त वर्तन झाल्यास वेळी वाग्प्रतोदाचे तडाखे लगावणार, तीच गोष्ट हे पत्र प्रेमळ मातेप्रमाणे गोड गोड-शब्दांनी व चांगल्या चांगल्या गोष्टींनी अप्रशस्त वर्तनाबद्दल मायेचे शासन करणार एवढे मात्र ध्यानात ठेवावे, की हे पत्र आचरट आईप्रमाणे फाजील लाड करणार नाही. या पत्रांत आता आपणास हवा तसा आचरट व पाचकळ मजकूर वाचावयास सापडेल अशी आशा धरून जे याचे वर्गणीदार होतील त्यांची अत्यंत निराशा होईल. नाटिका, फटिका अशी मोठमोठी नांवे घेऊन पाचकळ व फाजील मजकूर खरडण्यासाठी हे पत्र नव्हे. ज्यांस तशा मजकूराखेरीज कांही एक आवडत नसेल त्यांनी आमचेकडे आपली वर्गणी पाठवून आमचे हात विटाळू नयेत. परंतु ज्यांस पुढच्या माडीपासून चुलीपर्यंत व दिवाणखान्यांतील टेबलापासून फणी-करंड्याच्या पेटीपर्यंत कोणाच्या हाती पडले तरी हवे. त्याने हवे त्याच्या देखत निःशंकपणाने वाचण्यास हरकत नाही. असे पत्र पाहिजे असेल त्यांनी अवश्य करमणूकीचे वर्गणीदार व्हावे. ज्यांस पाश्चिमात्य व पौर्वात्य नाटक कादंबऱ्यादि ग्रंथातील अत्यंत निर्मल, सरस व उत्कृष्ट अशा ग्रंथांचा भाषांतरद्वारा रसास्वाद घेण्याची इच्छा असेल त्यानी अवश्य आम्हांस आश्रय द्यावा. सध्यांच्या आजच्या बऱ्यावाईट स्थितीचे कोणीही वाचले असतां बिलकूल नाक मुरडण्याचे कारण नाही, असे चित्र पाहिजे असेल त्या गृहस्थास आम्ही आदरपूर्वक निमंत्रण करतो. शनिवारी संध्याकाळी थकून भागून आल्यावर आपले कुटुंबातील लहान मोठ्या माणसांस जमवून खुशाल हसत खेळत करमणूक करून ज्ञान मिळविण्याची ज्यांस इच्छा असेल त्यांचे आम्ही नम्र सेवक आहोत. शुद्धतऱ्हेने सहकुटुंब सहपरिवार करमणूक करून घेऊ

इच्छिणारे सज्जन हो, विजया दशमीचे आत 'कुळकर्णी आणि मंडळी' कडे आपली नावे व पत्ता लिहून पाठवा. एक हजार वर्गणीदार असल्यास हे पत्र विजया दशमीच्या मुहूर्तावर पुढले शनिवारपासून सुरू होईल. तोपर्यंत फक्त सह्या पाठवा."

(करमणूक/ दिनांक १ नोव्हेंबर, सन १८९०, पान १०)

१८८६ साली सुरु झालेल्या 'मनोरंजन'चे चालक हरिभाऊ होते, त्यांचा उद्देश 'करमणूक' सारखाच होता. 'यात येणारे विषय शिक्षणाचा मुख्य उद्देश धरून जितके मनोरंजक व प्रतिष्ठित करता येतील तितके करण्याचा आमचा विचार आहे.' यावरून हरिभाऊंच्या संपादकत्वाचा कौल कळतो. करमणूक हे लोकांचे रंजन करून प्रबोधन करण्यासाठी काढलेले हे एक कौटुंबिक सद्भिरुचिसपन्न नियतकालिक होते.

टिळक आणि आगरकरांची राजकीय, सामाजिक कार्याची चळवळ या काळात ऐनभरास होती. अशा काळात 'करमणुक'चा उद्देश आणि कार्य काहीसे विसंगत वाटल्यास नवल नाही. पण करमणूकचा उद्देश हेच कार्य सौम्यपणे करण्याचा होता. त्यात सामाजिक सुधारणांचा लेखनातून पुरस्कार होता, पण रंजकतेवर सारा भर आणि लालित्यालाच प्राधान्य होते. वाङ्मयीन विकासाच्या दृष्टीने ही इष्टापत्तीच म्हटली पाहिजे. वस्तुतः हरिभाऊंनी ज्ञानप्रकाशाचे काम केले' सुधारकातही लिहिले. समाजाला अनुकूल करण्यासाठी त्यांचे अज्ञानपटल दूर सारण्यासाठी त्यांचे कार्य होते. १८८१ ते १९२० पर्यंत केसरीचा प्रभाव होता, पण केसरीचा केवळ राष्ट्रवादी विचारांनी भरलेला मार्ग 'करमणूक'ने स्वीकारला नाही. केवळ देशभक्तीची छाप करमणूकवर दिसत नाही, याचा अर्थ कालप्रवाहापासून अलिप्त असे हे साप्तहिक सांस्कृतिक आणि वाङ्मयीन होते. याच सुमारास इंदुप्रकाश, ज्ञानप्रकाशचे सामाजिक सुधारणेचे कार्य आगरकरांच्या पश्चातही चालूच होते, पण हा प्रवाह क्षीण असला तरी मुख्य जोरकस प्रवाह राजकारणाचा आणि देशभक्तीचा होता. अशाही परिस्थितीत करमणूकची एक सवती दिंडी पुढे चालली होती, ललित लेखन आणि मनोरंजनातून ज्ञान वाटण्याची त्यांची प्रतिज्ञा होती. संपादकाच्या प्रकृतीप्रमाणे करमणूक पत्रही सौम्य होते. केसरी परंपरेशी दूरान्वयानेही त्याचा संबंध नव्हता. हरिभाऊ राजकारण, नगरपालिका या सार्वजनिक क्षेत्रात वावरत असले तरी त्यांची वृत्ती राजकारण्याची नव्हती. मिल, स्पेन्सरच्या तत्त्वज्ञानाचा पुरस्कार करणाऱ्या आगरकरांचे त्यांनी स्वागत केले, तरी त्याचे 'करमणूक' वेगळेच होते. रंजक ललित लेखनातून सामाजिक सुधारणांवर भर देणे त्यांना इष्ट वाटे. त्यांची मते आगरकरांशी संवादी असल्याने नामदार गोखल्यांजवळ स्वतः आगरकरांनी आपली प्रकृती बिघडली असतांना, 'हरिभाऊ

सुधारकाचे काम ' स्वीकारतील तर मी सुधारक आनंदाने त्यांच्या स्वाधीन करीन असे उद्गार काढले होते.

हरिभाऊ सामाजिक सुधारणेला अनुकूल असले तरी आगरकरांची परखड आक्रमक शैली त्यांना मान्य नव्हती. समाजाला वाक्बाणांनी विद्ध करून शिकविण्याचा यत्न फसतो असे त्यांचे मत होते. लोक त्यामुळे उलट विरोधक होऊन बसतात म्हणून हरिभाऊ कटाक्षाने हे सर्व टाळतात. समाजाला कडकरीतीने न शिकविता गोड शब्दानी आंजारून, गोंजारून शिकविले तर त्याचा परिणाम चिरकाल टिकेल हे त्यांच्या पुरतेपणी मनात ठसले होते. या त्यांच्या स्वतंत्र विचाराने ' करमणूक ' प्रेरित झालेले होते.

काशीताई कानिटकरांनाही हरिभाऊंनी आबालवृद्ध ' करमणूक ' सारखाच घेतील व असा पेपर असल्यावर कंपनीच्या कामास प्रसिद्धी हा हा म्हणता मिळेल, असे लिहून कळविले होते. समाजहिताविषयी सर्वसामान्य लोकांच्या ठिकाणी उत्सुकता निर्माण करण्याचे दुष्कर कार्य करमणुकीच्या माध्यमातून करण्याचे उद्दिष्ट हरिभाऊंनी बाळगले होते. नवीन सुधारकांच्या पंथाचे तत्त्वज्ञान सामान्यजनास समजावून देऊन त्यास उन्नतीच्या मार्गाकडे नेण्याचे कार्य त्यांना करावयाचे होते. त्यांच्या या संकल्पाची ' करमणूक 'च्या जन्माने सिद्धी झाली.

**' करमणूक ' प्रारंभीचे सुभाषित**-अंकाच्या शिरोभागी काहिसा दुर्बोध खालील श्लोक छापलेला असे. ही प्रथा अखेरच्या अंकापर्यंत चालू होती.

" वदन्तु कतिचिद्धठारखफछटेति वर्णच्छटान्-
घटः पटइतीतरे पटु रटन्तु वाक्यारवात् ।
वयं बकुल मंजरी गलदलीन माध्वी झरी
धुरीण पदरीतिभिर्भतिणभिः प्रमोदामहे ।।१।।"

या श्लोकाचा संदर्भ दिलेला नसून त्यात काही मुद्रण दोषही आढळतात. मूळात सुभाषितरत्न भाणुगिरम् । सामान्य विप्रशंसा पान ३४, श्लोक ४९ मध्ये दिल्याप्रमाणे ' छटेति ' ऐवजी ' छठेति ' व ' वर्णच्छटा ' ऐवजी ' वर्णाच्छठा ' ' गलदलीन ' ऐवजी गलद**मन्दलीन** व **भण**तिभि ऐवजी **भणि**तिभिः पाहिजे. त्याचा अन्वय खालीलप्रमाणे लावता येईल.

' कतिचित् हठात् खफछठ इति वदन्तु
इतरे वाक्पाखात घटपट इति

पटु रटन्तु वयं बकुल मंजरी गलदमन्द
लीन माध्वी झरी धुरीण पदरीतिभिः
भणितिभः प्रमोदामहे ॥'

त्याचा अर्थ–

'काही लोक आग्रहपूर्वक खफछठ असे वर्णोच्चार भले करोत, आणखी अन्य कोणी आपल्या वाक्चातुर्याने घटपट इत्यादी चातुर्याने बोलोत, परंतु आम्ही मात्र बकुळ मंजिरीमधून गळणाऱ्या मकरंदाच्या स्त्रावाने भरलेल्या अशा पद पद्धतीने-पूर्ण वाक्यानेच आनंदित होतो.'

तात्पर्य लालित्यपूर्ण मधुर आणि रसाळ भाषणाने–वाणीने आम्हाला आनंद होतो असे हरिभाऊंनी 'करमणूक'चे ब्रीद पाळले आहे.

वैय्याकरणी अथवा नैय्यायिकापेक्षा येथे खऱ्या रसिकाची भूमिका महत्त्वाची आहे.

आज विनोदी मनोरंजन व ज्ञानासाठी नियतकालिके काढणाऱ्या संपादकांना हरिभाऊंनी सांगितलेली उद्दिष्टे उद्बोधक व अभ्यासनीय ठरावील अशीच आहेत.

## करमणूकचे अंतरंग–

'करमणूक' पत्राचा उद्देश सांगतानाच करमणुकीचे अंतरंग काय राहील याची कल्पना संपादकांनी वाचकांच्या माहितीसाठी जाहीर केली होती. त्यांनी करमणुकीत येणाऱ्या मजकुराची यादी पुढीलप्रमाणे दिली आहे.

१. आळीपाळीने दोन मोठाल्या गोष्टी. (या गोष्टी एका वर्षातच संपतील.
२. दोन चार अंकात संपणाऱ्या अशा लहान चटकदार गोष्टी.
३. पदार्थ विज्ञान, रसायन, अर्थ, शरीर, इत्यादी शास्त्रांचे ज्ञान करून देणाऱ्या गोष्टी.
४. नाटके इत्यादि.
५. वर्तमानसार (हे बहुतकरून नेहमी येईल.)
६. चटकदार चुटके व नकला हया तर नेहमी असावयाच्याच.
७. थोर पुरुषांची चरित्रे.
८. रम्यस्थलांची व प्रवासासंबंधी वर्णने.
९. निरनिराळ्या खेळांविषयी माहिती.

१०. उपयुक्त माहिती.

११. कविता (दर अंकात बहुत करून येतील.)

१२. चुलीपासल्या गोष्टी. (या सदराखाली स्त्रियांस उपयुक्त माहिती येईल.)

एका वर्षात प्रारंभ केलेली प्रकरणे त्या वर्षातल्या त्या वर्षात संपविण्याविषयी सक्त खबरदारी ठेविली जाईल, म्हणजे वर्षाचे पुस्तक बांधविण्यास ठीक पडेल.
(करमणूक दि. १ नोव्हें. १८९०, पान १०)

'करमणूक' च्या शुभारंभापासूनच हरि नारायण आपट्यांच्या सुविख्यात 'पण लक्षात कोण घेतो—' या कादंबरीचे लेखांक सुरू झाले. त्याचप्रमाणे प्रेसिडेंट ग्राफिल्डचे चरित्र, आठवड्यातील गप्पा गोष्टी, विनोदपूर्ण चुटके, कविता, उपयुक्त माहिती, वर्तमानसार, ज्योतिषशास्त्र इत्यादी विषयांवरील भरगच्च मजकूर येत राहिला. प्रारंभीला दिलेले आश्वासन शेवटपर्यंत संपादकानी काटेकोरपणे निभावले. सर्वांनी एकत्र सहकुटुंब आबालवृद्धाने वाचावे असेच लेखन. उदा. 'थोडक्यात पुष्कळ', 'आश्चर्य जपानी', 'इकडे तिकडे', 'गोविंदरावांची पत्रे', 'वर्तमानसार', 'विनोदी चुटके', 'येथील हालचाल', 'चमत्कारिक माहिती', 'तऱ्हेतऱ्हेच्या—नानातऱ्हेच्या-देशोदेशीच्या बातम्या', 'कूट प्रश्न', 'उपयुक्त माहिती', 'ज्ञानाचे कण', 'मधुरवचने', 'स्फुट गोष्टी', 'सगुणाबाईंची पत्रे' या विविध सदरांतून करमणुकीचे प्रसिद्ध केले. यात सर्वांच्या सुविधा होत्या हे या सदरांच्या नावातूनही कळते. वाचकांची उत्तम नाडी संपादकांनी जाणली. आणि निर्भेळ करमणुकीचा हेतू समोर ठेऊन 'करमणुक'चे हे असे अंतरंग साकार केले. वर्षाखेरी काही अंकातून विषयाची जंत्री दिली आहे. आणि जाणकार समीक्षक रसिकांचे अभिप्रायही छापले आहेत. काहीवेळा मधूनमधून अंकाच्या पहिल्या पानावर विषयानुक्रमणिका दिली आहे. पण त्यात सातत्य आढळत नाही.

करमणुकीने निर्मळ मनोरंजनाबरोबर वाचकांच्या ज्ञानात भर टाकण्याचा आटोकाट यत्न केला. विचारांना चालना दिली आणि मनोवृत्तींना उन्नती तत्पर करण्याचा प्रयत्न केला. विचारांना नित्यश: मिळणाऱ्या माध्वी झरीत मादकता नसून विचार प्रवर्तकता असे तिने बुद्धीला मालिन्य आणण्याऐवजी अंतःकरणाला शुद्ध येईल आणि दृष्टीवर मोहपटल निर्माण होण्याऐवजी अंत:परीक्षणाने जागृती घडून येईल. रसिकता आणि सर्वच क्षेत्रात 'आपण स्वत: जागे व्हावे, इतरांना जागे करावे.' अशी भूमिका 'करमणूक' पत्राची होती.

कविवर्य श्री. नारायण मुरलीधर गुप्ते यांची पहिली कविता 'प्रणय पत्रिका' १८९१ साली करमणुकीतून प्रसिद्ध झाली. त्यानंतर १९११ पर्यंत त्यांनी आणखी ८–१० कविता लिहिल्या, असा उल्लेख 'विश्रब्ध शारदेत' आला आहे. (पान ३९५)

असा अनेक लेखक, साहित्यिक, विशेषत: कवींना करमणूकीने वाव दिलेला आहे. त्या-त्या संदर्भात हे उल्लेख पुढे केलेले आहेतच.

रावसाहेब गोविंद वासुदेव कानिटकर व हरिभाऊंची मानलेली बहिण काशीताई कानिटकर यांच्याशी हरिभाऊंची बौद्धिक व वाङ्मयीन स्वरूपात मैत्री होती. त्यांच्यातील पत्रव्यवहार उद्बोधक आहे. एकाचवेळी विविध ठिकाणी हरिभाऊ लेखन करीत असले तरी करमणुकीचे वर्गणीदार, छपाई टापटीप, अचूक हिशेबीपणा यासाठीही ते भरपूर लक्ष पुरवित. हरिभाऊंनी 'नव्या वर्षाचा नवा अंक, तेव्हा यात एक नाटक, एक प्रहसन, एक कादंबरी व एक निबंध असलीच पाहिजेत' असे उल्लेखिले आहे. म्हणजेच करमणूक हे नाव कादंबरी, कथा, कविता, यांच्या विकासात महत्त्वाचे मानले गेले. त्याचे श्रेय हरिभाऊंच्या या विदग्ध वाङ्मयं दृष्टीला आहे. 'करमणूक 'चे मुखपृष्ठ आजवर उपलब्ध नियतकालिक ग्रंथात समाविष्ट झालेले आढळत नाही. तथापि 'दर्पण', 'प्रभाकर', 'ज्ञान प्रकाश', 'मुंबई अखबार', 'ज्ञानोदय', 'इंदु प्रकाश', 'केसरी', 'सुधारक', 'करमणूक', 'काळ' या मालिकेतील, 'ज्ञान प्रकाश', इंदु प्रकाश', 'केसरी', सुधारक' 'करमणूक' आणि 'काळ' या सहा वृत्तपत्रांचा गौरवपूर्ण उल्लेख वृत्तपत्रांच्या इतिहासात निरंतर केला जाईल असा भक्कम अभिप्राय मराठी नियतकालिकांचे इतिहासकार रा. गो. कानडे यांनी दिलेला आहे. (पान ५०) त्यांनी नामनिर्देश केलेल्या ६ नियतकालिकात हरिभाऊंचे 'करमणूक' आहे हे विशेष! पुढे ते म्हणतात,

"कै. हरिभाऊंची 'करमणूक' बृहन्महाराष्ट्रीय जनतेत अत्यंत लोकप्रिय झाली होती. करमणुकीतील निरनिराळ्या लेखांचे संग्रह फार लोकप्रिय झाले आहेत. ही एकच गोष्ट करमणुकीचे श्रेष्ठत्व प्रस्थापित करणारी आहे. करमणुकीचे अनुकरण करणारी अनेक वर्तमानपत्रे निघाली, पण त्यापैकी एकासही करमणुकीची सर आली नाही." (पान ४८)

तात्पर्य मनोरंजन आणि ज्ञान यांचा मनोज्ञ मेळ करमणुकीने घातला. त्यामळे अनेकविध विषयांवर कुटुंबातील सर्वांना उपयुक्त असा मजकूर देणारे हे साप्ताहिक अल्पावधीत लोकप्रिय झाले शरीरशास्त्र, सृष्टिशास्त्र व ज्योतिषशास्त्र विषयक लेखन आणि वाढती नवी नवी सदरे हे करमणूकचे आकर्षण होते.

जसजसा कालावधी उलटला ससतसे करमणुकीचे वाङ्मयीन स्वरूप अधिकाधिक मनोहर होत गेले. त्यातील 'लडिवाळ गोष्टी', 'गोड गाणी' इत्यादींनी वाचकवर्ग अगदी वेडावून गेला. एका तपाच्या अवधीत ८ कादंबऱ्या, ४०० लहान चटकदार गोष्टी, ४०० मनोहर, अभिरूची संपन्न करणाऱ्या कविता दिल्या. पदार्थ

विज्ञान, रसायन, अर्थशास्त्र शिवाय शास्त्रीय मनोरंजक माहिती असे विपुल साहित्य वाचकांना एक मेजवाणी म्हणूनच ' करमणूकी'ने दिले. चित्रे देऊन लेख व गोष्टी मनोरंजक पद्धतीने सजविण्याचा प्रयत्न केला तो कालमानाने यशस्वी होता असे म्हणावे लागेल.

मधुर स्वप्ने, ज्ञानाचे कण, मुलांची करमणूक, स्त्रियांस करमणूक, आमच्या देशाच्या गोष्टी, शास्त्रीय करमणूक, विश्वकुटुंबातील मंडळीची ओळख, मुलांसाठी कूट प्रश्न, थोरांचे बोल, सुवर्णकण विचार मधुकरी, साहित्य चर्चा, अशा नानाविध नवीन सदरांनी वाचकांना करमणुकीबरोबरच ज्ञानही मिळाले.

म्हणूनच मध्यमवर्गीय पांढरपेशा समाजाने ' करमणूक 'ला सतत उचलून धरले, पाठिंबा दिला. मान्यवर जाणकार साहित्यज्ञ रसिकांनी उत्तम दाद दिली. ऑ. ज. का. तेलग, पडिता रमाबाई, प्रा. वा. बा. केळकर, रमाबाई रानडे, काशीताई कानिटकर, सरस्वतीबाई पंडित, सौ. शिरगावकर, आत्माराम नूलकर, रा. रा. दि ह. वाकनीस, प्रि. वा. शि. आपटे यांनी पत्रे व अभिप्राय पाठवून ' करमणूक ' पत्राची वाखाणणी केली. थोराप्रमाणेच सर्वसामान्य वाचकांचीही या करमणूक पत्राला उत्तम साथ लाभली. वाचक उत्कंठेने जिज्ञासेपोटी पुढील अंकाची प्रतिक्षा करीत होता. शेकडो शाळांचे कार्य एकटच्या ' करमणूक ' पत्राने करून दाखविले असे म्हणतात. अनेक स्त्रियांना लिहिते करून स्त्री लेखिकाही निर्माण केल्या. स्त्री शिक्षण आदि वाङ्मयाच्या क्षेत्रातीलही या पत्राने केलेली भरीव कामगिरी म्हणावी लागेल. हरिभाऊंच्या प्रकृति धर्माप्रमाणे सौम्य, भावसुडान, सात्विक, सोज्ज्वळ, मर्यादाशील, विशुद्ध विचारांनी युक्त ही आपली जनमानसातील प्रतिमा ' करमणूक'ने अखेरपर्यंत टिकवून ठेवली हे खास वैशिष्टच म्हणून सांगता येईल.

## करमणुकीतील ' कादंबरी '–

कादंबऱ्यांचे उद्दिष्ट या लेखात हरिभाऊंनी ' कादंबऱ्यांचा उद्देश मनोरंजन हा आहेच, पण त्याबरोबरच समाजाला सद्‌बोध करून त्यास सन्मार्गास लावण्याचे सत्कार्य कादंबऱ्यांच्या हातून होणे जरूर आहे' असे नमूद केले आहे. त्यांच्या या विचाराचा प्रत्यय त्यांच्या कादंबऱ्यांतून येतो.

करमणुकीच्या १ ल्या तपात हरि नारायण आपटे यांच्या सामाजिक व ऐतिहासिक मिळून एकूण आठ कादंबऱ्या दिल्या. ' त्यात ' पण लक्षात कोण घेतो,' ' म्हैसूरचा वाघ ' ' मी,' ' भयंकर दिव्य ' ' रूपनगरची राजकन्या ' यांचा समावेश होता. १८८८ सालीच हरिभाऊंनी आपण ' करमणूक ' काढून पुढे हयातभर कादंबरी

लेखन करावे असे ठरविले होते. 'आजकालच्या गोष्टींचा कर्ता' असे अगदी सुबोध नाव आपल्या ग्रंथ कर्तृत्वाची ओळख पटवून देण्यासाठी त्यांनी स्वीकारले होते.

त्यांच्या 'मधली स्थिती' कादंबरीची आणि 'आनंदाश्रमा'ची जडणघडण एकाचवेळी झाली. त्या वास्तवचित्रणाने हुबेहुब नक्कल वास्तवाची रेखाटली गेली. वर म्हटल्याप्रमाणें समाजाचे जिवंत चित्रण करून समाजाला सन्मार्गाला लावण्यासाठीच जणु हरिभाऊंचा अवतार झाला होता, असा विचार ह. मो. महाजनी यांनी बोलूनही दाखविला होता.

'करमणूक' ला एक वर्ष पूर्ण झाले तेव्हा संपादकांनी संपूर्ण वर्षाकडे मागे वळून पाहून प्रामाणिकपणे आपल्या काही त्रुटींची कबुली दिली आहे. त्यात कादंबरीच्या पाल्हाळाची व लांबलेल्या स्वरूपाची कल्पना यावी असा उल्लेख आहे. 'पण लक्षात कोण घेतो' कादंबरीच्या संदर्भात ते लिहितात–

'पण लक्षात.' ही आत्मवृत्त कथनपर कादंबरी अपुरी राहिली, याचे कारण एवढेच की ती 'आजकालच्या गोष्टी' नावाच्या कथावलीपैकीच एक कथा असून फार मोठी आहे प्रथम कादंबऱ्या देण्यास सुरुवात केली. त्यावेळी दोन्ही एक वर्षात संपतील अशी उमेद होती. परंतु तसे होईल असे दिसेना, तेव्हा दोन्ही गोष्टी सारख्या चालू ठेवून अपुऱ्या ठेवण्यापेक्षा त्यातल्या त्यात लहान असेल ती एक पुरी करावी व दुसरी पुढील सालाकरीता राखून ठेवावी असा विचार केला. पुढे पुष्कळ वाचकांच्या आग्रहास्तव बारीक टाइपास फाटा द्यावा लागला, त्यामुळे वरील विचारच कायम करावा लागला. तथापि यंदा तसे न करता मजकूर जितका जास्त घालता येईल तितका घालून वरील गोष्ट पुरी केली जाईल. या गोष्टींमध्ये विशेष काय आहे हे आलेल्या प्रकरणांवरून वाचकांच्या लक्षात येईलच. नव्या वर्षात मात्र "मुख्य कादंबरी, 'पण लक्षात कोण घेतो.' हीच पुरी केली जाईल." असे स्पष्ट केले आहे.

(करमणूक, १७ ऑक्टोबर, १८९१)

'गणपतराव', 'मधली स्थिती', 'आजच' आणि 'कर्मयोग' वजा जाता सर्व कादंबऱ्या हरिभाऊंनी करमणुकीतून प्रसिद्ध केल्या म्हणजे त्यांच्या कादंबरीने करमणुकीतून मराठी कादंबरीत हरिभाऊंचे नवे युग निर्माण केले, म्हणून त्याचा विस्ताराने परामर्ष घेणे येथे गरजेचे आहे.

हरिभाऊंच्या कादंबरी लेखनापर्यंत मराठी मध्ये 'मुक्तामाला', 'राजा मदन' सारख्या अद्भुतरम्य कादंबऱ्या हळबे, रिसबुडांसारख्या विशेष कादंबरीकारांच्या विशेष लोकप्रिय होत्या. प्रत्यक्ष हरिभाऊंच्या कादंबरीच्या परिशीलनातून त्यांच्या कादंबरीचे

विशेष लक्षात घेतले पाहिजे. हरिभाऊ बोधवादी होते, त्यावरून कादंबरीला बोधवादाच्या मर्यादा पडल्या किंवा कलात्मकता दुणावली असे ढोबळ अनुमान काढून चालणार नाही. महत्त्वाचे म्हणजे हरिभाऊ वास्तववादी कादंबरीकार होते. त्यांच्या या वास्तववादाचा विकास प्रा. नरहर कुरुंदकरांनी नमूद केल्याप्रमाणे वामन मल्हारात झालेला दिसतो आपल्या कादंबरीचा आढावा घेणाऱ्या 'धार आणि काठ' ग्रंथात ते नमूद करतात–

'वाङ्‌मयीन गुणवत्तेच्या दृष्टीने हरिभाऊंच्या मागे दुवा सांधण्यासाठी असे फारसे नाहीच. त्या दृष्टीने हरिभाऊंचा उदय मराठी कादंबरी विश्वात अकल्पित व स्वयंभूच मानला पाहिजे. (पान ४४)

या कादंबऱ्यांची हरिभाऊंची लेखनशैली अत्यंत साधी सुबोध, प्रवाही, बालबोध व पारदर्शक आहे त्यात व्यक्तींना जिवंत करण्याचे सामर्थ्य आहे. सर्व बारकावे सांगणारी हरिभाऊंची शैली व्यक्तींच्या चेहरेपट्टीपेक्षा व्यक्तिमत्त्व आणि मन साकार करते प्रसंग चित्रणाचे सामर्थ्य तिच्यात आहे. जीवनाचा सूक्ष्म तपशील टिपणारी ही नवी शैली होती. पत्र या शैलीत गतीचा कमाल संथपणा आणि पाल्हाळ हे दोष जाणवतात. व्यक्ती आणि प्रसंग यशस्वीपणे साऱ्या तपशीलासह हरिभाऊ यामुळेच उभा करू शकले. सर्वसामान्य वास्तवाचे स्वाभाविक आणि जिवंत वर्णन करण्यासाठी समर्थ असणारी ही अलौकिक शैली म्हणावी लागेल. स्त्री पुरुषांची सुखदुःखे या शैलीने खऱ्या अर्थाने जिवंतपणे चित्रित केली; याचे सारे श्रेय हरिभाऊंच्याकडे जाते. पण त्यामुळे या शैलीत संयम आणि सुचकतेचा अभाव जाणवतो. तथापि हरिभाऊंच्या उज्ज्वळ आणि अस्सल प्रतिभेचे वैशिष्टच म्हणजे त्यांनी वास्तवाशी राखलेले इमान आणि त्यांची जिवंत प्रत्ययकारिकता होय.

सुधारक, हरिभाऊ आगरकरांपेक्षा गोखलेंच्या उदारमतवादाने भारलेले होते. त्यांनी मराठी कादंबरीला बोधवादाच्या कुंपणावरून कलात्मकतेच्या प्रांतात उडी मारायला लावली. या दृष्टीने हरिभाऊंची सामाजिक कादंबरी मराठीत प्रथमच जिवंत माणसांच्या जीवनाविषयी प्रामाणिक कुतूहल निर्माण करू शकली हे लक्षात येते आपल्या कादंबऱ्यांतून त्यांनी मानवी मनाचे विविध नमूने पेश केले. मराठी कादंबरीने प्रथमच माणसाकडे माणूस म्हणून पाहिले ते हरिभाऊंच्या कादंबरी लेखनातूनच.

स्वतःच्या कुचंबणेची जाण नाही आणि आपल्या विकासाला प्रतिकूलता आहे अशा दोन्ही प्रकारच्या मागास समाजातील दुहेरी कुचंबणेचे चिंतन यशस्वीपणे हरिभाऊंनी आपल्या कादंबऱ्यांतून केले आहे. तात्पर्य हरिभाऊंच्या कादंबरीत सुधारक

हरिभाऊंवर कलावंत हरिभाऊंनी मात केली हेच खरे. जीवनाभिमुख राहून समाज जीवनाविषयी सतत कुतूहल बाळगल्यामुळे हरिभाऊंच्या करमणूकने दिलेल्या कादंबरीला जिवंतपणाच्या स्पंदनाचा स्पर्श झालेला आहे. यादृष्टीने कुरुंदकर देतात तो 'पहिल्या संवेदनाक्षम कादंबरीकाराचा मान' हरिभाऊंचा आहे. रंजक बोधाकडून मराठी कादंबरीला त्यांनी स्वाभाविक जिवंत प्रत्ययकारीत्वाकडे आणले. मराठी कादंबरीच्या विकासाचे नवे दालन करमणुकीतच खुले झाले.

हरिभाऊंच्या करमणुकीतून क्रमशः प्रसिद्ध झालेल्या महत्त्वपूर्ण कादंबऱ्या व त्यांचा कालखंड पुढीलप्रमाणे आहे.

पण लक्षात कोण घेतो (१८९०-९३).
यशवंतराव खरे (१८९२-९५).
मी (१८९३-९५).
जग हे असे आहे (१८९७-९९).
भयंकर दिव्य (१९०१-१९०३).
मायेचा बाजार (१९१०-१९१२).

झोला, डयूमस या फ्रेंच लेखकांच्या कादंबऱ्या हरिभाऊंना फ्रेंच अवगत असल्याने त्यांनी वाचलेल्या होत्या. बेकन, मील, स्पेंसरही त्यांनी वाचलेला होता. मीलचे 'सब्जेक्शन ऑफ विमेन', त्यांनी उल्लेखिले आहे.

करमणूक साप्ताहिकातून कादंबऱ्यांच्या क्रमशः प्रसिद्ध होण्याने पाल्हाळिकपणा, विस्कळितपणा, रेखीवपणाचा अभाव, सूत्रबद्धतेचा अभाव, संदिग्धता इत्यादी काही दोषही निर्माण झालेले नाकारता येत नाहीत. गरजेनुसार उत्स्फूर्तही लेखन संपादकाला करावे लागते, हरिभाऊही त्याला अपवाद नाहीत.

'पण लक्षात कोण घेतो', 'मी' या कादंबऱ्यानी मराठीत आत्मचरित्रपर कादंबरी हा नवा प्रकार रुजविला. त्याचे आगळे कौशल्य हरिभाऊंनी चरित्र लेखकाच्या कल्पित भूमिकेशी समरस होऊन स्वतःचे व्यक्तित्व विसरून दाखविले.

मराठीतील 'स्कॉट' ही उपाधी शोभून दिसेल अशा हरिभाऊंच्या ऐतिहासिक कादंबऱ्याही करमणुकीतून इ. स. १८९० ते १९१५ च्या दरम्यान क्रमशः पुढीलप्रमाणे प्रसिद्ध झाल्या.

| | |
|---|---|
| म्हैसूरचा वाघ | (१८९०-९१) |
| उषःकाल | (१८९५-९७) |
| केवळ स्वराज्यासाठी | (१८९८-९९) |
| रूपनगरची राजकन्या | (१९००-०२) |

| | |
|---|---|
| चंद्रगुप्त | (१९०२–०४) |
| गड आला पण सिंह गेला | (१९०३–––) |
| सूर्योदय | (१९०५–०६) |
| मध्यान्ह | (१९०६–०८) |
| सूर्यग्रहण | (१९०८–०९) |
| कालकूट | (१९०९–११) |
| वज्राघात | (१९१३–१५) |

'कर्नल मीडोज टेलर' यांच्या 'टिपू सुलतान'चे रूपांतर 'म्हैसूरचा वाघ' आहे. 'उषःकाल', 'सूर्योदय,' 'सूर्यग्रहण,' व 'गड आला पण सिंह गेला.' या ४ कादंबऱ्या शिवकालीन आहेत. तर बाकीच्या मराठेतर इतिहासाशी निगडीत आहेत. महत्त्वाचे म्हणजे हरिभाऊंनी, ऐतिहासिक सत्य नसून ऐतिहासिक सत्यकथाभास या ऐतिहासिक कादंबऱ्या आहेत ? ही जाणकार समीक्षकाची भूमिका निभावली. यातच त्यांच्या 'वज्राघात' सारख्या अजोड ऐतिह्य कादंबरीच्या यशाचे रहस्य दडलेले आहे.

हरिभाऊंच्या ऐतिहासिक कादंबऱ्यांचे वैशिष्टय म्हणजे त्यांनी आपली संविधानके महाराष्ट्राबरोबरच उत्तरेस हिमालयापासून दक्षिणेस विजयनगर; म्हैसूर-पावेतो, पूर्वेस मगधापासून, पश्चिमेस राजस्थानापावेतो, इ. स. पूर्व पंचवीसशे वर्षापासून इसवी सनाच्या अठराव्या शतकाच्या अखेरपावेतो विविध कालांचा आणि देशाचा आवाका त्यांनी पेलला.

यथातथ्य चित्रण करणारा वास्तववादी, सामाजिक कादंबरीकार, तेवढ्याच यशस्वीपणे ऐतिहासिक कादंबऱ्यांचीही निर्मिती करतो याचे हे विशेष लक्षणीय उदाहरण म्हणावे लागेल. ऐतिह्य वातावरण निर्मितीत त्यांचा हातखंडा होता. त्या दृष्टीने हरिभाऊ ऐतिहासिक कादंबरीचे अध्वर्यु शोभतात.

## 'करमणूक' मधील कविता–

'करमणूक'मध्ये निदान एक तरी कविता प्रत्येक अंकात हमखास असे. वर्षभरात ४० ते ५० कविता दिल्या जात. शेवटी शेवटी कविता विभागात मात्र विशेष भर पडत गेली आणि नावानिशी कविता प्रसिद्ध केल्या गेल्या. परंतु प्रारंभी कवीचा नामोल्लेख नसे. कालावधी–लेखनकाल दिलेला नसे. दिलेच तर कवीचे टोपण नावच प्रामुख्याने असे. या टोपण नावाच्या यादीत 'त्र्यंबक', 'उद्धव', 'शिवतनया', 'माधवानुज', 'चिंतामणी', 'धर्मभगिनी', 'जनार्दन', 'वामन', 'द. प. चि.' 'आनंदीरमण', विद्याधन विहारी', 'कवी गोविंदाग्रज', 'देशमुख', 'भास्कर,'

'यशवंत', 'नारायण', 'जगन्नाथ', 'दत्तात्रय', 'साधुदास', 'रेंदाळकर', 'चंद्रशेखर', 'वसंत माधव', 'टिळक' अशी कितीतरी नावे आहेत. मात्र यावरून या कविता नेमक्या कोणाच्या ? काव्येतिहासात त्याच्या नोंदी करणे अवघड होऊन बसते. त्यात 'केशवसुत', 'चंद्रशेखर', 'गोविंदाग्रज', रेंदाळकर', 'टिळक' यासारखे नामवंत कवी आवर्जून आलेले आहेत हे विशेष. 'पुष्पाप्रत', 'कविता आणि प्रीति', 'फुकट दवडलेला तास', 'दिव्य ठिणगी', 'भृंग', 'शर्मिष्ठा संवाद' अशा कितीतरी नामांकित कवींच्या लक्षणीय कविता 'करमणूक' मधून छापलेल्या आढळतात. महत्त्वाचे म्हणजे या कविता सुरस आहेत आणि संस्कारक्षम आहेत. आणि तशा त्या असाव्या असा संपादकांचा कटाक्ष दिसतो. क्वचित मा. ना. पाटणकर सारख्यांच्या प्रासंगिक कविताही छापलेल्या आहेत. उदा० 'झारसाहेबांचे दुःखोद्गार.'

'परीक्षेत नापास झालेल्या विद्यार्थ्यांचे उद्गार' सुसंस्कारक्षम कवितेचा नमुना म्हणून हा एक 'आंबट गोड श्लोक' पाहण्याजोगा आहे.

'कंठी माळ जरी पडेल न कधी माझ्या तिच्या हातची
आशावृक्ष समूळ तोडुनि जरी माझा तिने टाकीला
नैराश्यात सदैव पोहत–बरें वाटे मला–राहणे
स्त्रीचा अन्य परंतु वास न लगे चित्रांत कृष्णेविना.'

(करमणूक दि. १४।४।९२)

किंवा काव्यरूपाने दिलेले कोडेही सुंदर शब्दच्छल करणारे आहे. त्याचा नमुना–'कोडे उकला.'

'मधुत्व शर्करेचे
हरिता लागेल ती कशी गोड ?
वेडाच राहतो मी
जर माझें दूर सारिले वेड !'

**खुलासा–**

'खुळखुळा' या शब्दांतील खुळ (वेड) काढून घेतले तरी खुळा (वेडा) कायम तो कायमच राहतो.

(वर्ष दुसरे : अंक २७ वा.)

पण असल्या स्फुट कवितेबरोबरच मराठी कवितेच्या इतिहासातील मानदंड म्हणविले जाणारे कवी आणि त्यांच्या कविता 'करमणूक' मधून प्रसिद्ध झाल्या. रसिकांच्या आदरास पात्र ठरलेल्या या कविता आणि कवी आहेत. हरिभाऊंचा साहित्यिक मित्रपरिवार आणि लोकसंग्रह याला कारणीभूत दिसतो. 'भृंग' कविता

केशवसुतांनी खेडहून १९-११-९० ला लिहिल्याची करमणूकीत नोंद आहे. तर 'पुष्पाप्रत' २६.मार्च, १८९२ ला प्रसिद्ध झालेली आहे. तर रात्रीस ओरडणाऱ्या 'घुबडास' ही गोविंदाग्रजाची कविता (दि. २५ ऑ. १९०६ ला प्रसिद्ध झाली.) मराठी कवितेच्या इतिहासात १८७४ ते १९२० हा कालखंड कवितेच्या क्षेत्रातील परंपरा आणि नवता यांच्यातील संघर्षाचा कालखंड मानला जातो. याचा अर्थ या कालखंडाचे मोल विशेष आहे. तत्कालीन काव्यशास्त्र नियमांच्या कचाट्यातून कविता मोकळी झाली ती व्यक्तिवादाच्या उदयामुळेच. व्यक्तिमत्त्वाच्या मुक्त विकासाची जाणीव काव्याला नवे वळण देण्यास कारणीभूत ठरली.

भावगीतात्मक जाणीव, आत्मलेखन, विशेषत: प्रेमविषयक प्रणयप्रधान, निसर्ग प्रेम, सामाजिक विचार, गूढगुंजन, सुनीतादी नव्या काव्य प्रकारांचा पुरस्कार, इत्यादी गोष्टी केशवसुतांनी मराठीत आणल्या.

(म. वा. इतिहास, खंड ५ वा. पान १८३)

प्रि. वा. शि. आपटे यांनी करमणूकवर दिलेल्या अभिप्रायात म्हटले आहे की, 'कविता थोड्या थोड्या दर अंकात येतात, पैकी काही फारच मनोहर, उदात्त, रसपूर्ण व वास्तविक कवित्व शक्तीदर्शक आहेत. म्हणून त्या लोकादरास पात्र ठरतात असे म्हटले आहे.' (करमणूक : २४ ऑक्टो. १८९१)

## करमणुकीतील कथा–

काही लोककथा, लीलाचरित्र, दृष्टान्तपाठ यातील काही चुटकेवजा बोधकथा, यातून मराठी कथा अगदी क्षीण प्रवाहात अवतरली. पंचोपाख्यान ग्रंथातील भाषांतरित कथा तर कधी ऐतिहासिक बखरीतील छोट्या मोठ्या कथा प्रसंग वर्णनातून हा प्रवाह किंचित जोर धरु पाहत होता. पण खऱ्या अर्थाने हरिभाऊंच्या स्फुट गोष्टींच्या रुपाने हा प्रवाह नवे वळण घेऊन प्रभावीपणे प्रकट झाला. प्राचीन कथेतील नैतिक बोध आणि रंजकता यांचे हरिभाऊंच्या स्फुट गोष्टींचे नाते आहे. हरिभाऊंनी नीतीपाठ आणि शिक्षण देणाऱ्या सिंहासन बत्तीशी, पंचतंत्र, हितोपदेश, राजा प्रतापादित्याचे चरित्र या कथांपेक्षा आपल्या स्फुट गोष्टींना सामाजिकतेची भक्कम बैठक दिली. करमणुकीत १८९० नंतर हरिभाऊंनी लिहिलेल्या स्फुट गोष्टी ही आधुनिक मराठी कथेची सुरवात आहे. कथा आणि कादंबरी यातील नेमका फरक कोणता हे ज्या काळात पुरेसे स्पष्ट झालेले नव्हते. त्या काळात एका कलावंत मनाने केलेली ही निर्मिती आहे. काहिशी पाल्हाळिक गोष्टी वेल्हाळ म्हणता येईल अशीच ही गोष्ट आहे, पण तिची रचना मात्र कथेसारखी केली आहे. एका प्रगल्भ सामाजिक जाणिवेतून तिचा जन्म झाला. हरिभाऊंची करमणूकीतून साकार झालेली कथा पहिली म्हणून विशेष महत्त्वाची ठरते. कारण क्वचित् आधुनिक कथेत शोभेल असा प्रारंभ,

वातावरणाला दिलेले प्राधान्य, एकजिनसी संस्कार घडवील अशी ' काळ तर मोठा कठीण आला ' यासारखी कथा त्यांनी लिहिली. ऐतिहासिक, रहस्यमय, रूपकात्मक अशी कथेची विविध दालने त्यांनीच वाचकांना पहिल्यांदा ओळखीची करून दिली. जीवन दर्शनाचा प्रयत्न घटनांचे वैशिष्ट्य, प्रसंगांना फुलविण्याची हातोटी या हरिभाऊंच्या जमेच्या गोष्टी लक्षात घेतल्या तरी केवळ उद्‌बोधनाचा हेतू जाणवत असूनही त्यावर कादंबरीप्रमाणेच कलावंत, कथाकाराने मात केली हेही लक्षात येते हरिभाऊंचे मोठेपण हे की त्यांनी कथेला परभृततेतुन मुक्त करून स्वतंत्र केले. त्यांचे हे ऋण मराठी कथेने सदोदित मानावे असे आहे.

हरिभाऊंनी आपल्या लांबलचक शैलीत लिहिलेल्या या स्फुट गोष्टींचे एकूण ४ भाग आहेत. त्यातील पहिल्या दोन भागातच " स्फुट कथा " आली आहे. हरिभाऊंची कथा आजच्यासारखी वाचनीय असण्यापेक्षा ती ' श्रवणीय ' होती. कारण फाल्हाळ भरपूर असे. मात्र मराठी कथेला अद्‌भुतरम्यता सोडून जीवनाभिमुखता हरिभाऊंनी प्राप्त करून दिली. त्यात सामाजिकता, नवा सुधारणावाद उमटला आहे.

हरिभाऊंच्या विशेष लक्षणीय स्फुट कथा म्हणून ' कसे दिवस गेले ', ' काळ तर मोठा कठिण आला ', (सामाजिक दीर्घकथा), ' पाडव्याला भेट ', ' थोड्या चुकीचा घोर परिणाम ', ' उलटीकडून सुरवात ' ' अपकाराची फेड उपकारांनीच ' इत्यादी (वास्तववादी कथा) ' भूताटकीचे घर ' (रहस्यकथा) तर ' डिस्पेप्सिया ', ' खाशी तोड ', ' हरवलेली किल्ली ' इत्यादी (विनोदी कथा). या कथांचा उल्लेख करावा लागतो. दुर्गाताईची ओवाळणी ही एक अशीच भगिनी प्रेमावरील अत्यंत हृदयस्पर्शी कथा आहे. मात्र यातील पाडव्याला भेट, खरी की खोटी आणि दुर्गाताईची ओवाळणी या कथा मासिक मनोरंजनातून प्रसिध्द झालेल्या आहेत.

शिक्षण, मनोरंजन आणि विचारांना प्राधान्य देणाऱ्या हरिभाऊंच्या वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाने पुढील काळातील कथाकारांवर आपला ठसा ठामपणे उमटविला. अद्‌भुताकडून वास्तव चित्रणाला मराठी कथेला सामोरे जायला लावले. हरिभाऊंच्या साध्या, ओघवत्या, सुबोध शैलीमुळे त्यांची कथा स्त्रीयांनाही आवडू लागली. त्यांच्यातील गिरीजाबाई केळकर, आनंदीबाई शिर्के या लेखनप्रवृत्त झाल्या. नंतरचे सहकारी कृष्ण, ना. ह. आपटे यांनाही कथाकार म्हणून ' कथात्मकता ' लाभली. ' करमणूक ' पत्राच्या योजनेतच प्रत्येक अंकातून एक लहान गोष्ट देत जाण्याचा संकल्प हरिभाऊंनी केला होता. त्याप्रमाणे त्यांनी स्वतः व इतरांनी लिहिलेल्या अनेक स्फुट गोष्टी ' करमणूक ' मधून प्रसिद्ध झाल्या. लहान लहान गोष्टींचा पुरवठा नियमितपणे यावेळेपासून होऊ लागला आणि तो इतका मानवला की मनोरंजन, सरस्वती मंदिर, नवयुग, उद्यान, मकरंद, विद्या विनोद, अरविंद इत्यादी

अनेक मासिकांनी ती प्रथा उचलली. गंभीर विषयाला वाहिलेल्या नियतकालिका-नाही लघुकथेखेरीज पूर्तता व समाधान वाटेना अशी स्थिती निर्माण केली ती करमणुकीनेच. प्रारंभी उपदेशपर व्याख्यान व शेवटी तात्पर्य देण्याची हरिभाऊंची पद्धत ' उलटीकडून सुरवात ' या कथेत दिसते. नवकथेने हे दोन्ही माळलेले आहे. ' गरीब बिचारी पार्वतीबाई ' कर्ता माणूस कुटुंबाकडे दुर्लक्ष करून नाटकाच्या नादी लागल्यावर काय होते हे सांगणारी ही कथा हृदयद्रावक झाली आहे. दुःखान्तापेक्षा सुखान्त करण्याकडे त्यावेळच्या नाटकातील प्रघाताप्रमाणेच हरिभाऊंच्या कथेकडे पाहण्याचा दृष्टिकोन होता. सुमारे २१ गोष्टी त्यांच्या स्फुट गोष्टींच्या संग्रहात आलेल्या आहेत. पण एकात्म एकसंघ परिणाम देण्याच्या दृष्टीने त्या कथा कमी पडतात. त्यात भावनेचे पसरलेल्या, विखुरलेल्या सूर्यकिरणांप्रमाणे स्फुल्लिंग देण्याची ताकद नाही. ' दोन चित्रे ' ही कथा अधीच विचित्र रंगविलेली आहे. १९१५ पूर्वी लिहिलेल्या या गोष्टी म्हणजे हरिभाऊंचे स्फुट गोष्टींचे युग म्हणून संबोधिले जाते. वृत्तांतकथनपर, लघुकादंबरी सदृशवर उपदेशात्मक या कथा असत. स्फुट गोष्टी वाचकांच्या वाचनाच्या दृष्टीने विशेष सोयीच्या ठरल्या. त्यामुळे त्याची मागणी व पुरवठा वाढू लागला. या काळात प्रसिद्ध झालेल्या गोष्टींचे स्वतंत्र संग्रह झाले नाही, त्यामुळे त्या दुर्लभ मासिक पुस्तकातूनच शोधून अभ्यासाव्या लागतात. त्यातही लेखकांचे नामोल्लेख नसल्यामे अनेक अनुल्लेखित राहतात. बंगाली, इंग्रजी कथेचा एक परिणामही या काळात कथांवर दिसतो. बी. सी. मुजेरांच्या कथेवर हरिभाऊंचाच पगडा काही बाबतीत आढळतो. त्या वृत्तांत देणाऱ्या असून नीती-बोधापेक्षा मनोरंजनावर भर देणाऱ्या आहेत.

' करमणूक ' कालखंड म्हणजे मराठीतील स्वतंत्र कथा निर्मितीचा कालखंड म्हणता येईल पण असे असूनही इंदुमती शेवडे म्हणतात त्याप्रमाणे हरिभाऊंनी कथेची व्याख्या कुठेही दिलेली आढळत नाही. किंवा कथातंत्राचा जाणिवपूर्वक व मन.पूर्वक उपयोग केलेला दिसत नाही. (पान ३५) मात्र ' करमणूक ' हे नाव म्हणजेच मराठी कथा विकासाचा आलेख हेही त्यांनी नमूद केलेले आहे. (पान २९) ' सुंदर बोधपर व करमणूक करणाऱ्या गोष्टी करमणूकमध्ये असतात. उदा० हरवलेली किल्ली ही गोष्ट विशेष गाजलेली आहे तर ' आगबोट बुडाली ' या गोष्टीचे शाळेत जाणाऱ्या प्रत्येक मुलाने पठण केले पाहिजे असे सौ. काशीबाई कानेटकर यांनी आपल्या अभिप्रायात म्हटले आहे.

## करमणूक : संकीर्ण लेखन-

' करमणूक ' मधून नाटके, ललितलेखन, किंवा चरित्र लेखन यापेक्षा संकीर्ण, अवांतर किंवा सामान्य ज्याला म्हणता येईल असेच लिखाण विपुल प्रमाणात झाले

आहे. त्याचे महत्त्वाचे कारण "करमणूक'ची प्रकृती हेच आहे. करमणूकीच्या उद्दिष्टांतच संकीर्ण लेखन 'डायजेस्ट' सारखे) बसते. मनाची करमणूक करण्याच्या उद्देशाने हे पत्र निघाले होते, या पत्राचा मुख्य हेतू प्रबोधनाचाच होता. सर्वांनी वाचावे असे पत्राचे स्वरूप असल्याने त्यात बाळबोधपणाही होता. तत्कालीन राजकीय, सामाजिक, औद्योगिक चळवळीचे चित्र अल्पांशाने चित्रित करण्याचा प्रयत्न हरिभाऊंनी केला होता. थोडी नाटके, ललित लेखन, काही कविता त्याचप्रमाणे बोधप्रद छोट्या पण चटकदार गोष्टी, स्त्री पुरुषांची चरित्रे अनेकविध शास्त्रांचे मनोवेधक ज्ञान, थोडक्यात गोड अशी निवडक माहिती, पोट धरधरून हसविणारे विनोदी चुटके-किस्से, संपादकांनी हे सारे मनःपूर्वक दिले. नुसती विषयाची जंत्री तपासली किंवा अनुक्रमणिका पाहिली तरी त्याची कल्पना येऊ शकते. आर्यभूषण प्रेसमध्ये छापून प्रसिद्ध केलेल्या पुस्तकांवरूनही याची कल्पना येते.

उदा. घटकाभर करमणूक (संपा. ह. ना. आपटे इ.) करमणूक मधील 'सगुणाबाईंची पत्रे नव-विवाहितांनी ध्यानी घ्यावीत अशी आहेत. स्त्रियांनी अवश्य वाचण्यासारखे विषय मोठ्या सभ्यतेने, भारदस्तपणे लिहिलेले आहेत. तशीच 'गोविंदरावांची आपल्या मुलास पत्रे' हे सदरही उद्बोधक होते. लहान मुलास, रिझविणारी आणि उपदेश करणारी ही पत्रे होती. 'संदेश' कार अच्युतरावांच्या वत्सला वहिनीसारखी ती भाष्य करणारी किंवा फारशी चिकित्सकही नव्हती.

परीक्षेचे महत्त्व, काय साधावयाचे, स्वभाव कसा असावा? याचे मार्गदर्शन गोविंदराव आपल्या बोधपर पत्रातून करीत असत. तर सगुणाबाईंची मुलीस पत्रे अशीच उपदेशपर होती. त्यांचे विषय सासरच्या माणसांची बोलणी, सूनेची घरातील मंडळीशी वागणूक, संतोषी स्वभाव, माहेरचा ठोकळा, कुचरपणा, उधळमाधळ इत्यादी असत.

## ब. चरित्रात्मक लेखन-

चरित्रे अगदी प्रारंभापासून देण्याचा प्रघात या करमणूक पत्राने पाडला. 'रंकाचा राजा झाला; अथवा 'प्रेसिडेंट गार्फील्डचे चरित्र' त्यांनी १ ल्या अंकापासून सुरू केले होते. या चरित्राचा प्रारंभ लक्षणीय आहे.

"There's a good time coming, boys A good time coming.

The pen shall supersede the sword And Right, not might, shall be the lord, In the good time coming worth, not Birth, shall rule mankind And be acknowledged stronger."

कर्तबगारीनें सार्वजनिक हित करून दाखविणाऱ्यासच अमेरिका मोठे मानलें. आत्मविश्वास आणि स्वकर्तृत्व फुलविण्यासाठी असे चरित्र सादर केले गेले. याखेरीज 'भूषण कवी', महाराणी स्वर्णमयी, 'राजा अशोक वर्धन,' 'विद्यापती,' 'रामकृष्ण,' शीख लोकांचे महापुरुष १) 'गुरू नानक' २) 'गुरू गोविंदसिंह' ३) 'गुरू रणजितसिंग,' 'सती कोरम देवी' इ. अनेक चरित्रें करमणूकीतून प्रसिद्ध झाली पण या चरित्र लेखनाचे स्वरूप व्यक्तिविषयक तपशीलवार माहिती देणारे होते त्यात कलात्मक चरित्र लेखनाचा दृष्टिकोन फारसा (बोधपर स्वरूप असल्याने) आढळत नाही.

४ नोव्हे, १९०५ च्या अंकात पुस्तक कसे वापरावे हेही विस्ताराने सांगितले आहे

१) जाडकागदाचे कव्हर घाला. २) आतील मुख्यपृष्ठावर नाव टाका. ३) पाने बांधून नसल्यास घ्यावीत. ४) पुस्तक कामापुरते काढून पुन्हा जागेवर ठेवावे. ५) स्वच्छ ठेवावीत, हाताळणी असावी. ६) उजव्याबाजूच्या वरील कोपऱ्याकडून अंगठ्या जवळच्या अथवा मधल्या बोटाने पुस्तकाची पाने उलटावीत. ७) बोटास थुंकी लावू नये. ८) पुस्तकाची खूण म्हणून पाने मुडपणे, जाड पेन्सील वा वस्तू खूण म्हणून ठेवणे. पुस्तक उघडेच पालथे मारणे वाईट. ९) बुकमार्क किंवा कागद घालावा. १०) उशाशी घेऊ नये. ११) पुस्तके दुसऱ्यास देऊ नये.

## V) काही मौजेच्या व चमत्कारिक गोष्टी–

संपादकांनी मोठ्या गमतीशिर अशा पुढील गोष्टी निःसंकोच मांडल्या आहेत.

१) 'करमणूक'ची पुरवणी ज्याला पाहिजे त्यालाच फक्त मिळेल.

२) १ रु. ची २० बक्षीसे लॉटरी पद्धतीने वर्गणीदार क्रमांकावर ठेवण्यात आली होती.

३) वर्गणीदार होणाऱ्या वाचकास एक रोजनिशी भेट मिळत असे.

४) 'वक्ष भागापर्यंतच्या तसबिरी' हे पासपोर्ट साईझ फोटोचे भाषांतर होते.

५) 'महाभारत' घेणारास 'रामायण' फुकट अशी एक जाहिरात आहे.

## VI) काही विनोदी किस्से–

करमणूकमधून अतिशय दर्जेदार व मोकळेपणे हसविणारे किस्से, चुटके आलेले आहेत, त्याचा मासला पुढे पेश केला आहे.

१) रशियात 'काय भयंकर थंडी आहे' म्हटल्याने एका भारतीय माणसाला पोलीस तंबी देतो, कारण त्याला वाटते हा रशियालाच नावे ठेवतो. म्हणून 'अगदी बोलू नका' हेच रशियात बरे.

२) ' कोरीव लेणी ' सुट्टीत पाहण्यासाठी. खोदली. एका विद्यार्थ्याचे उत्तर
३) ' स्मरणशक्ती ' चा वर्ग घेतला पण शिक्षक मुलाचा नाव, पत्ता विचारायचे विसरले व विद्यार्थी फी द्यायची विसरला.

४) चहा कसा झाला ? यावर अभिप्राय–तुमच्या कुटुंबाला तुम्ही चहा पिणं सोडावं असं वाटतं, असा चहा झालाय.

५) तुम्ही नेहमी भांडता याचा अर्थ काय ? असे पत्नी विचारते अन् पति उत्तरतो–' तो अर्थ भांडण चालू असताना विचार ! आता मी कसा सांगू शकेन ?'

६) ' तुम्हाला काय आवडतं ?', ' तू आज जे केलं नाहीस ते ? ' असे अनेक किस्से वाचकांची चांगली ' करमणूक ' करीत.

## II ) नाट्यलेखन –

' करमणूक 'मधून नाट्यलेखनासाठी फारशी पाने देता येत नाहीत अशी खंत जरी हरिभाऊंनी व्यक्त केली, असली तरी ३ नाटके, ३ प्रहसने १९१० साली ' करमणूक ' मधून प्रसिद्ध झाली. त्यांची नावे ' जयध्वज ' अथवा ' असूयाग्नि,' शमन,' श्रुतकीर्तनाचरित,' ' सुमतिविजय,' ' धूर्त विलसित,' ' मारून मुटकून वैद्यबुवा, ' जबरीचा विवाह ! ' (' व्हीवटर,' ' ह्यूगो,' ' काँग्रीव्ह,' ' मिलिअर,' ' शेक्सपिअर ' यांच्या नाटकाची ही रूपांतरे होती ) हरि नारायण आपटे यांची ' संत सखुबाई,' संगीत सती पिंगला इ. नाटकेही करमणुकीतूनच प्रसिद्ध झाली होती. परंतु यापेक्षा अधिक विशेष काही नाटकासाठी या पत्राला करता आले नाही.

पहिले वर्ष संपल्यावर गतवर्षाचा आढावा घेतला. त्यात आपल्या राहून गेलेल्या त्रुटी दाखवतांना संपादकांनी उलगडा केला आहे. ' नाटके वगैरे देण्याचा उद्देश स्थानाभावामुळे तूर्त रहित करावा लागत आहे.'

(करमणूक : ७ ऑक्टो. १८९१)

आणि एवढ्यावरच नाटकावर पडदा पडतो. म्हणजे नाट्य क्षेत्रात करमणूकीला विशेष भरीव कार्य इच्छा व समज असूनही करणे शक्य झाले नाही हे स्पष्ट होते.

## III) ललित लेखन–

ललित लेखन मात्र लक्षात येण्या इतपत सातत्याने करमणूकीतून प्रसिद्ध होत राहिले, कारण या पत्रांचे स्वरूपच लालित्यपूर्ण होते. वर्णनात्मक लेखनात ' एक मौजेचा सण,' ' किल्ले पांडवगड ', ' तुर्कस्थानविषयी काही माहिती ', ' मुंबईची मयसभा ', ' लंडन जवळील अत्यंत भयंकर जागा ', ' श्री परशुराम इत्यादी माहिती आलेली आहे.

प्रा. वा. ब. केळकर यांनी करमणूकवरील आपला अभिप्राय देतांना

; करमणूक ' सारखे नावाप्रमाणे यथार्थ वृत्तपत्र पाहिजे होते, ती उणिव भरून निघाली. सहृदय वाचकांच्या अंतःकरणाला आल्हाद देईल अशा तऱ्हेने ती भरून काढली हे श्रेयस्कर आहे. ' करमणूक ' तर नावाप्रमाणे उत्तमच पण बोध करून घेणाऱ्याला व ज्ञानपिपासु आपापल्या इच्छा, मधूर व मनोहारी नेहमीच्या शाळेतील निरस व कटू मार्गाहून अत्यंत भिन्न अशा मार्गाने तृप्त करून घेण्यास आपले नामी साधन आहे. रक्तापासून काय होते, भूक लागण्याचे कारण, जिऊबाईची अगदी लहान लेकरे, फुलांचे रंग इत्यादी उपयुक्त ज्ञानाने भरलेले व सुबोध साध्या भाषेत लिहिलेले निबंध, बोधपर लहान लहान गोष्टी, मनोरंजक चुटके, किरकोळ माहिती, सुरस व मधुर कविता (हा एक पत्राला शोभविणारा अलंकार) असे मनोरंजनाने भरलेले हे पत्र आहे." असे म्हटलेले सार्थ आहे. तर याच अंकात दि. ह. वाकनीस यानी दिलेला आपला अभिप्रायही येथे लक्षात घेणे उचित होईल ते म्हणतात, ' इंग्लंडमध्ये मनाचे रंजन करून ज्ञान देणारी पत्रे त्यावेळी होती तसे समाधान करमणूकने दिले. नाटक कादंबऱ्यादी ग्रंथांचे वाचन कंटाळवाणे वाटे त्यासच करमणूकीने इतके मोहित केले, लेखनपटुत्वाची -निदर्शक भाषा अतिगोड व -लिहिण्याची शैली अवर्णनीय आहे.' (-करमणूक दि. २८-७-१८९२)

" लहान मोठ्यांचा रिकामा वेळ आनंदात व मानसिक उन्नतीचा करमणुकीने घालविला जातो शनिवारी हे पत्र कधी हाती पडेल असे होऊन जाते. आबाल-वृद्धांचीही हीच उत्कंठा असे. जणु काही आठवड्यातून एक दिवस मिळणारी ती विश्रांती आहे " असा रसिकांचा कौल या पत्राने मिळविला. या पत्राची योग्यता व अपेक्षा लोकांना त्याहून अधिक स्त्रीयांना उमजली आहे. याचे कारण काळजीने, शोधकतेने, मनःपूर्वक श्रमाने करमणुकीचे काम केले जाते. विविध विषय दर आठवड्याला शोधून काढून मनोरंजनाला प्रारंभ, पौष्टिक, रुचकर व आल्हादकारक असे पक्वान्न चे ताट घरोघर पोहचते करावयाचे आणि खरोखरच थक्क करणारी त्यातील विषयांची जंत्री आहे. त्यात अकारण वितंडवादात वेळ न घालविता वनस्पती, प्राणी, ज्योतिष, इत्यादी शास्त्रांची माहिती देणारी करमणूक खाण बनली.

## IV) शास्त्रीय लेखन-

' करमणूक'ने मनःपूर्वक शास्त्रीय माहिती नेमाने दिली ती अक्षरशः स्तिमित करणारी आहे. उदा: अति मोठा कालवा, फोटोग्राफ, हीरा, चित्र, धुराचा उपयोग, पचनक्रियेचा काल, पक्षांचे स्नान, रंगांधत्व, रडणारे झाड, लष्करी गुप्त गोष्टी कशा फोडतात, हिंदुस्थानातील खनिज द्रव्ये, आमची हल्लीची राजधानी, झाडांचा उपयोग (२५ जून, १८९२) (ओझोन हवेत असल्याने लाभ हे पर्यावरण शास्त्राचा महिमा, वाढण्यापूर्वी सांगितले.) घड्याळे कां बिघडतात, पुष्कळ दिवस कसे जगावे, हजामतीने

केसांची वाढ सुधारते काय ? असे असंख्य विषय आलेले आहेत. आजही महत्त्वाचे हे शास्त्रीय विवेचन ठरू शकेल असेच आहे,

'रानबदके खारे पाणी पितात, पण त्यांना स्नानाला ते पाणी चालत नाही. पक्षी 'धुळीत, पाण्यात अर्धांग वा सर्वांग बुडवून स्नान करतात, तर काही पक्षी राखेत तर काही ओल्या मातीत स्नान करतात, असे हे मौलिक चिंतन आहे. असेच आणखीही काही विषय उल्लेखिता येतील. करमणूकच्या ३ मार्च, १९०६ च्या अंकात 'युरोपातील फुलांची भाषा दिलेली आहे. ती अशी, बाभूळ = गुप्तप्रेम, झेंडू = हलकट मन, शेवंती = आपत्काळी आनंदवृत्ती, तांबडी शेवंती = प्रेम, पांढरी शेवंती = सत्य, अंजीर = वादविवाद, गुलाब = सद्‌गुण, जास्वंद = सौंदर्य, मोतिया = मी तुजवर प्रेम करतो, सूर्यफूल = पूज्यबुद्धी त्यानंतर टीप दिली आहे की 'साहेब लोकास त्यात मुख्यत्वे मॅडम लोकास फुलांची भेट पाठवतांना सावधपणा राहावा हा हेतू आहे.'

३१ मार्च १९०६ च्या अंकात स्त्री पुरूषांची तुलनाही लक्षवेधी आहे.

पुरुष = शक्तिमान, कर्तृत्व, धाडसी, विश्वासपूर्ण, कीर्ती, भाषण खात्रीपूर्वक, कठिण-हृदय, संकट टाळणारा, व्यवहार पाहणारा, न्यायी, शास्त्र अवगत, तर,

स्त्री = सौंदर्यवती, सोशिक, शालीन, विनयशील, घर सजविणारी, भाषण मन वितळविते, नाजुक संकटातील दुःख हलके करते, न्याय अन्याय, ज्ञान कमी, क्षमाशील, रसिकता अवगत असते हे वेगळेपण सांगितलेले आहे.

**समारोप–**

इंग्रज शासनाकडून साहित्य निर्मितीला कोणत्याही प्रकारचे साहाय्य नसतांना, किंबहुना काही वेळा विरोध झालेला असताना खाजगी प्रयत्नांनी चालविण्यात येणाऱ्या नियतकालिकांनी फार मोठी कामगिरी बजावली व साहित्य निर्मितीला फार मोठा हातभार लावला असे म्हणता येईल. हरि नारायण आपटे यांच्या 'करमणूक' सारख्या साप्ताहिकाने देखील एक साप्ताहिक पत्र असूनही चिरस्थायी वाङ्मय मराठीमध्ये निर्माण केले आहे.

करमणुकीसारखे साप्ताहिक ललित वाङ्मय निर्मितीच्या प्रतिज्ञेनेच सुरू झाले आणि चालविले गले होते. त्यातून हरिभाऊ आपटे यांचे समृद्ध कादंबरी आणि कथा वाङ्मय प्रथम प्रसिद्ध झाले होते. करमणुकीमुळे स्फुट मराठी कविताही नव्याने प्रकाशात आली. करमणूकसारख्या नियतकालिकाने मराठी दर्जेदार साहित्य निर्मितीस आणि प्रसिद्धीस जे बहुमोल साहाय्य केले, त्यामुळे इ. स. १८९० ते १९१७ या कालखंडातील मराठी साहित्य समृद्ध झाले असे म्हणता येईल.

'करमणूक'ने अकबर ते अभिमन्यूपर्यंत कोणताच विषय कधी वर्ज्य मानला नाही. जसे त्यात अकबराचे काही नीतीनियम आले आहेत तशीच रणांगणात आसन्नमरण होऊन पडलेल्या अभिमन्यूचेही उद्‌गार आहेत.

का.शीताई क.नि‍टकर म्हणतात, ' करमणूक पत्र सारखे दुसरे पत्र आजपर्यंत माझ्या पाहण्यात नाही. निदान महाराष्ट्रात तरी नाही.'

असाच अभिप्राय वि. सी. सरवटे यांनीही व्यक्त केला आहे.

' करमणूक त्याच्याइतके लोकप्रिय, मनोरंजनाबरोबर ज्ञान देणारे उच्च कोटीचे अभिजात अभिरूचीचे दुसरे कोणतेही साप्ताहिक मराठीत झाले नाही. (पान. ३५६) ' थोडक्यात पुष्कळ ' या सदराच्या नावाप्रमाणेच देणारे १ एप्रिल, १९११ ला वसंत अंक काढलेले, ' शकुंतला व मिरांदा ' (११।८।१९०६) ' विदग्ध वाङ्मय ' आणि ' भाषा (१९१०) अशा लेखातून समृद्ध वाङ्मय विचार मांडणारे (करमणूक : १९१०-११) करमणूक साप्ताहिक असले तरी कर्झन-शाहीच्या जुलमाचे कोठेही पडसाद त्यात कसे उमटले नाहीत, ते संपूर्णपणे राजकारणापासून कसे अलिप्त, सोवळे व सोज्वळ राहू शकले याचे आश्चर्य वाटल्याशिवाय राहत नाही. संपादकाच्या निग्रही व सौम्य व्यक्तिमत्त्वातच याचे कारण दडलेले आहे. राजकीय व सामाजिक गदारोळात भाग न घेता ' करमणूक 'ने संपूर्णपणे वाङ्मयीन स्वरूपाचे कार्य करून दाखविले ही हरि नारायण आपटे यांची केवळ अजोड संपादकीय किमयाच म्हणावी लागेल त्यामुळे पुढे जी वाङ्मयीन नियतकालिके निघाली त्याची सुरवातीची पायाभरणी हरिभाऊंच्या ' करमणूक ' ने केली असे म्हणता येईल.

## अभ्यासाची साधने-


१) मराठी नियतकालिकांचा इतिहास (१८३२-१९३७)/ रा. गो. कानडे, कर्नाटक पब्लिसिंग हाऊस मुंबई, १९३८.

२) मराठी साहित्य समालोचन / वि. सी. सरवटे, सी. ना. गवारीकर, खंड १-२, मराठी साहित्य संमेलन २० वे, इंदूर १९३७.

३) मराठी वृत्तपत्रांचा इतिहास रा. के. लेले, कॉन्टिनेंटल पुणे, १९८४.

४) मराठी वाङ्मयाचा इतिहास (खंड ५/भाग १)/संपा० रा. श्री. जोग म सा. प. पुणे, १९७३.

५) मराठी नियतकालिकांचा वाङ्मयीन अभ्यास (खंड १)/ संपा. व. दि. कुलकर्णी, मुंबई विद्यापीठ व श्रीविद्या पुणे, १९८७

६) रत्नाकर-साहित्यसूची (१९२६-१९३३)/डॉ. शुभांगी वाड, १९८७.

७) हरिभाऊ/डॉ ल. म भिगारे, स्कूल कॉलेज, कोल्हापूर, १९५६.

८) हरिभाऊ विविध दर्शन/ म. ना. अदवंत, स्कूल कॉलेज कोल्हापूर, १८८६.

९) मराठी कथा : उगम आणि विकास/डॉ. इंदूमती शेवडे, सोमैया पब्लिकेशन्स, मुंबई सं व. सु. आ. १९८२.

१०) धार आणि काठ/नरहर कुरूंदकर देशमुख, पुणे. १९७१

११) मराठी नियतकालिकांची सूची (१८०० ते १९५०)/संपा० दाते/काळे/बर्वे, पुणे,

१२) मराठी ग्रंथसूची/दाते शं. ग. पुणे, १९४३.


*

# डॉ. गिरधारी यांचे इतर प्रकाशित साहित्य :

१. अभिव्यक्ती : अनमोल प्रकाशन, पुणे / १९७७ (प्रस्तावना : कुसुमाग्रज)

२. आलेख : राधेय प्रकाशन, नागपूर / १९८१

३. मराठी शुद्धलेखनाचा मार्ग : विभा प्रकाशन, नासिक / १९८५

४. मराठी साहित्यातील ययाती : विभा प्रकाशन, नासिक / १९८९

५. हरिभाऊंचे साप्ताहिक करमणूक : विभा प्रकाशन, नासिक / १९९१

## संपादित साहित्य :

६. पी. एच्.डी. प्रबंध : रूपरेषा आणि निष्कर्ष : गो. ए. सोसायटी प्रकाशन, नासिक / १९८०

७. महाभारतातील ' दुर्गा स्तोत्र : विभा प्रकाशन, नासिक / १९८३

८. नामदार गोपाळ कृष्ण गोखले चरित्र : गो. ए. सोसायटी प्रकाशन, नासिक / १९८३

९. जिज्ञासा : गोखले एज्युकेशन सोसायटीचे जिज्ञासा महाविद्यालय प्रकाशन, नासिक / १९८३

## आगामी साहित्य :

१०. कर्ण आणि मराठी प्रतिभा

११. आदिवासी जीवन आणि शिक्षण

१२. आदिवासी विद्यार्थी मराठी सुधार

१३. महाभारतातील बोधकथा

१४. लोकसंख्या शिक्षण आणि आदिवासी महिला

## लेखकाविषयी थोडेसे-

**डॉ. भास्कर गिरधारी** हे गोखले एज्युकेशन सोसायटीचे आजीव सदस्य असून यासंस्थेच्या कला आणि वाणिज्यजव्हार (जि. ठाणे) महाविद्यालयाचे प्राचार्य आणि मराठी विभाग प्रमुख आहेत. मुंबई विद्यापीठाच्या मराठी अभ्यास मंडळाचे ते अध्यक्ष असून विद्वतसभा, अधिसभा, कलाशाखा, बहिःशाल शिक्षण मंडळाचे ते सदस्य आहेत. लेखक, वक्ते आणि समीक्षक म्हणून ते सुपरिचित असून त्यांचे ५ समीक्षा ग्रंथ, ३ संपादित पुस्तके आणि शेकडो अभ्यासपूर्ण लेख प्रकाशित आहेत. काही लेख विविध ग्रंथात समाविष्ट झालेले आहेत. प्रमुख मराठी नियतकालिकातून ते सतत लेखन करतात. काही पारितोषिके, पुरस्कार आणि सन्मान त्यांना लाभले आहेत. आकाशवाणी आणि दूरदर्शनवर कार्यक्रम सादर झाले आहेत. महाभारत आणि आदिवासी लोकसंस्कृती हे त्यांच्या विशेष आवडीचे आणि खास चिंतनाचे विषय आहेत. विविध साहित्यिक, शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि शासकीय संस्थांचे ते सदस्य आणि सक्रीय कार्यकर्ते आहेत.

---

सन्मार्ग प्रिंटिंग प्रेस, अलिबाग-रायगड,